दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

रविवार पुरवणी २३ जून २०२४



# गोव्यात साजरा होणार बारावा 'वैश्विक हिंदु राष्ट्र महोत्सव' !

जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

गेल्या काही वर्षांत भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या, संस्थांच्या सभांतून, कार्यक्रमांतून त्याचा पुनरुच्चार केला जात असल्याचेही पाहायला मिळते आहे. हिंदू राष्ट्र म्हणजे भारतीय संविधानाला डावलून केवळ एकाच धर्माच्या कल्याणासाठी केलेली व्यवस्था असणार कि काय असे वाटून काही जण या संकल्पनेला विरोध करताना दिसत आहेत तर काही जण अशा प्रकारची मागणी करणे असंविधानिक असल्याचे सांगत यास विरोध करत आहेत. बहुसंख्य असलेल्या हिंदुस्थानाला हिंदू राष्ट्र म्हणून घोषित करणे खरेच असंविधानिक आहे का याबाबत या लेखातून थोडक्यात जाणून घेऊया !

देशाच्या स्वातंत्र्यानंतर काही काळ निद्रिस्त असणारा हिंदू समाज हळूहळू जागृत होऊ लागला आहे. हिंदूंच्या प्रथा, परंपरा, हिंदूंची प्रतीके, श्रद्धास्थाने यांच्या विविध माध्यमांतून होणाऱ्या विडंबनाच्या आणि अपप्रचाराच्या विरोधात तो व्यक्त होऊ लागला आहे, सनदशीर मार्गाने या प्रकारांना विरोध करु लागला आहे. नुकताच येऊ घातलेल्या आमिर खानच्या मुलाच्या 'महाराज' या चित्रपटाचे प्रसारण गुजरात उच्च न्यायालयाने स्थगित केले हे त्याचेच फलित आहे. हिंदूंनी संघटितपणे केलेल्या विरोधामुळे हा चित्रपट नियोजित तारखेला प्रसारित होऊ शकला नाही. सलमान खानच्या ‘दबंग ३’ या चित्रपटातील एका गाण्यात साधू आणि देवता यांच्या वेशभूषेत काही जण अंगविक्षेप करत नृत्य करताना दाखवण्यात आले होते, हिंदूंनी केलेल्या विरोधामुळे ते दृश्य चित्रपटातून काढण्यात आले. हिंदूंनी केलेल्या विरोधामुळे अक्षय कुमारच्या ‘लक्ष्मी बॉंब’ चित्रपटाचे नाव बदलून 'लक्ष्मी' असे करण्यात आले. कुंभमेळ्यात हिंदूंवर लादण्यात येणारा प्रवासी अधिभार रहित करण्यात आला. श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठापणेपूर्वी अयोध्येत ८४ कोसी यात्रामार्गात मद्य-मांस यांवर बंदी आण्याची हिंदूंनी एकमुखाने केलेली मागणी मान्य करण्यात आली. हिंदूंमध्ये जागृती झाल्याची ही हल्लीची काही मोजकी उदाहरणे आहेत. आजतागायत हिंदूंना गृहीत धरून मनोरंजन क्षेत्रातून हिंदूंच्या देवीदेवतांचा अवमान करणारी मंडळी आता सतर्क झाली आहेत. जात-पात, संप्रदाय, संघटना, पक्ष यांमध्ये विखुरला गेलेला हिंदू समाज आता हिंदू म्हणून एक होऊ लागला आहे. हिंदुच्या संघटनशक्तीमुळे सेक्युलर म्हणून स्वतःची ओळख दाखवणाऱ्या पक्षाची प्रमुख मंडळीही तिर्थाटने करू लागली आहेत. हिंदू समाजात होत चाललेला हा बदल अचानकपणे झालेला नाही. हिंदूंच्या संघटनासाठी हिंदू जनजागृती समिती नामक एक संघटना मागील अनेक वर्षांपासून अविरतपणे झटत आहे. हिंदूंना संघटित करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली ही समिती मागील ११ वर्षांपासून गोव्यात ‘वैश्विक हिंदु राष्ट्र महोत्सवा’चे आयोजन करत आहे. यंदा २४ ते ३० जून या कालावधीत फोंडा, गोवा येथे श्री रामनाथ देवस्थानातील श्री विद्याधिराज सभागृहात ‘द्वादश अखिल भारतीय हिंदु राष्ट्र अधिवेशन’ अर्थात् ‘वैश्विक हिंदु राष्ट्र महोत्सव’ संपन्न होत असल्याचे या समितीच्या वतीने मुंबई मराठी पत्रकार संघात पत्रकार परिषद घेऊन जाहीर करण्यात आले. मागील ११ अधिवेशनांच्या माध्यमातून २५ राज्यातील १००० हुन अधिक हिंदु संघटना या अधिवेशनाच्या माध्यमातून संघटित झाल्या आहेत. या सर्व संघटना यंदाच्या अधिवेशनात सहभागी होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

१९४७ साली देशाची धर्माच्या आधारावर फाळणी झाली आणि बहुसंख्य मुसलमानांचा पाकिस्तान हा स्वतंत्र देश निर्माण झाला. तेव्हाच भारताला हिंदु राष्ट्र म्हणून घोषित का करण्यात आले नाही ? तेव्हापासून आतापर्यंत भारताच्या अनेक भागांत मिनी पाकिस्तान तयार करण्याचे षडयंत्र अविरतपणे सुरु आहे.२०४७ सालापर्यंत भारताला इस्लामी राष्ट्र बनवण्याचे मोठे षड्यंत्र असल्याचे राष्ट्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीत समोर आले आहे. अशा वेळी स्वयंभू हिंदू भूमी असलेल्या भारताला स्वत:ची ओळख पुन्हा मिळवून देण्यास लोकांचा विरोध असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हिंदू राष्ट अर्थात रामराज्य. आजही जगाच्या पातळीवर आदर्श राजकीय व्यवस्था म्हणून रामराज्याचे उदाहरण दिले जाते, ज्यामध्ये मनुष्यासह समस्त प्राणीमात्राच्या कल्याणाचा आणि उध्दाराचा प्राधान्याने विचार केला जातो. द्वापारयुगात जगद्गुरू भगवान श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनाखाली युधिष्ठिरांनी स्थापन केलेले 'धर्मराज्य' हे हिंदु राष्ट्रच होते. पाच पातशाह्याना चारी मुंड्या चित करून छत्रपती शिवाजी महाराजांनी उभे केलेले हिंदवी स्वराज्य हे हिंदु राष्ट्रच होते ज्यामध्ये सर्व पंथांचे लोक गुण्यागोविंदाने नांदत होते.

आजमितीला हिंदु राष्ट्राची चर्चा केवळ भारतातच नव्हे, तर जागतीक पातळीवर प्रारंभ झाली आहे. भारत हिंदु राष्ट्राच्या दिशेने अग्रेसर होत आहे, असे जागतिक अभ्यासकांचे मत आहे. त्यामुळे हिंदु राष्ट्राच्या मागणीला भारतातच नव्हे, तर जागतिक पातळीवर समर्थन मिळत आहे. सर्वोच्च न्यायालयात ‘केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य’ या गाजलेल्या खटल्यात वर्ष १९७३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या १३ न्यायाधिशांच्या खंडपिठाने ‘कोणत्याही शासनाला संविधानात सुधारणा करण्याचा अधिकार असला, तरी ते शासन संविधानाच्या मूलभूत आराखड्याला किंवा चौकटीला धक्का पोहोचेल, असे पालट करू शकत नाही’, असा आदेश दिला होता. हा आदेश दिल्यानंतर ३ वर्षांतच, म्हणजे वर्ष १९७६ मध्ये तत्कालीन सरकारने संविधानाच्या प्रस्तावनेत पालट करून त्यात ‘सेक्युलर’ आणि ‘सोशलिस्ट’ हे शब्द घातले. यामुळे हे पालट म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधातील कृत्य आहे. आज या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका चालू आहे आणि लवकरच संविधानातील सेक्युलर शब्दाचा त्यातून निकाल लागेल. कायदेतज्ञांच्या मते ज्याप्रमाणे ४२ वी घटनादुरुस्ती करून ‘पंथनिरपेक्ष’ आणि ‘समाजवाद’ हे शब्द राज्यघटनेत घुसडले, ते शब्द हटवून त्या जागी ‘हिंदु राष्ट्र’ आणि ‘आध्यात्मिक’ हे शब्द राज्यघटनेत घातले जाऊ शकतात. संविधानाच्या चौकटीत राहून समाज आणि राष्ट्र यांच्या हिताची संकल्पना मांडणे, हे पूर्णतः संविधानिक आहे ! आणि भारताला संविधानिक पद्धतीने हिंदू राष्ट्र म्हणून घोषित करता येऊ शकते !

मागील ११ वर्षांपासून दरवर्षी गोव्यात साजरे होणारे अखिल भारतीय हिंदु राष्ट्र अधिवेशन म्हणजे हिंदू धर्माच्या अभ्यासकांसाठी, हिंदुत्वनिष्ठांसाठी एक अनमोल पर्वणी असून यंदाही द्वादश अधिवेशनाच्या निमित्ताने हिंदुत्वासाठी वर्षभर तन, मन आणि धनाने कार्य करणाऱ्या देश विदेशातील मान्यवरांच्या मार्गदर्शनाची आणि त्यांचे अनुभव ऐकण्याची संधी श्रोत्यांना मिळणार आहे.

**मनाच्या हिंदोळ्यावर**



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.

# बिचारा सत्यवान

"रानात जाऊन एक वडाची मस्त 'फोटोजेनिक' फांदी तोडून घेऊन या." सौभाग्यवतीची आज्ञा शिरसावंद्य मानून बाळूने खांद्यावर कुऱ्हाड घेऊन जंगलाची वाट धरली. तसा बाळुचा आणि वडाचा हल्ली बऱ्याच दिवसात संपर्क झाला नव्हताच. मात्र तरीही पुर्वी पाहिलेले वटवृक्ष त्याच तर जागेवर असतील, त्यांना कुठे जागा सोडता येतेय? या विचाराने बाळू जंगलाकडे निघाला. तरी नशीब जंगलात शिरल्यावर काहीच पावलांच्या अंतरावर बाळुला एक जुनाट वटवृक्ष दृष्टीस पडला. पुर्वी या वटवृक्षाखाली गुराढोरांची, माणसांची फार वर्दळ असायची. दरवर्षी गावातले गुराखी वडाखालचा परिसर साफसूफ करायचे. दुपारी याच वटवृक्षाच्या छायेत गुरेढोरे निवांत रवंथ करीत बसायची. मात्र कालौघात लोकांनी जंगलाकडे पाठ फिरविली आणि वटवृक्षाचे सारे वैभव निघून गेले.



बाळू वटवृक्षाजवळ गेला. त्याने पाहिले, काटेरी वेली, तशाच काटेरी झुडुपांनी वटवृक्षाला चहुबाजूंनी वेढले होते. आज त्या वटवृक्षाखाली जाण्यासाठी बाळूला फार मोठी कसरत करावी लागली. तो कसाबसा वटवृक्षाच्या मुळाशी गेला. कुऱ्हाड सावरीत तो बुंध्यावर चढला. बायकोने सांगितली तशी एक फांदी त्याला जवळच दिसली. तो त्याच फांदीवर घाव घालण्यासाठी पुढे सरसावला. पण तेवढ्यातच "थांब!" अशी जोराची हाक त्याच्या कानांवर पडली. तो अचानक शहारला, किंचित घाबरला. त्याने अलवार खाली वाकून पाहिले तर साक्षात यमराज वडाखाली येऊन पोहोचला होता. राकड, धडधाकट रेडा, त्याचा भयंकर चेहरा, त्याच्या पाठीवर स्वार झालेल्या यमराजाचाबी तसाच चेहरा. रेड्याच्या शिंगांशी मिळती जुळती यमराजाची शिंगे, यमराजाच्या हातातला मृत्युपाश वगैरे सारे बघून बाळू चरकलाच. वटसावित्रीसाठी वडाची फांदी तोडायला निघालेला सत्यवान, त्याचे वडावरुन पडणे, सावित्रीचे धावत येणे, यमराजाला सत्यवानाचे प्राण परत करायला लावणे, सत्यवानाचे जीवंत होणे वगैरे वगैरे. तो प्रसंग जसाच्या तसा बाळुच्या डोळ्यांसमोर उभा राहिला. आता आपलादेखील 'सत्यवान' होणार! आता हा यमराज काही आपल्याला सोडत नाही. आता आपला खेळ खल्लास! पुर्वी सत्ययुगातल्या त्या सावित्रीकडे यमाला, देवादिकांना 'वेठीस' धरून सत्यवानाचे नेलेले प्राण परत मिळविण्याची धमक होती. ते सत्ययुग होते. आजच्या कलियुगात कशाची शाश्वती नाही.

आमया सावित्रीला तर बाजारातून साधे जिन्नस आणता येत नाही. कुरीअरने आलेले पार्सल 'रिटर्न' करता येत नाही. झाले... संपला आपला कारभार! हे देवा... कुठे असलासच तर वाचव बाबा. नाना विचारांच्या जंजाळात बाळू 'सुदिरबुदिर ' झाला. तरीही उसने अवसान आणीत तो अलगद खाली उतरला. आज पहिल्यांदाच तो असा प्रत्यक्ष यमाला पाहत होता. मात्र त्याने आतापर्यंत कल्पना केलेल्या वर्णनापेक्षा हा यमराज त्याला वेगळाच दिसला. बाळू थरथरतच वडाच्या बुंध्यावरून खाली उतरला. त्याने पुन्हा यमाच्या भयंकर चेहऱ्याकडे पाहिले. मात्र अनपेक्षितपणे यम त्याच्याकडे  बघून मंद हसला. यमाचे हसणे बघून बाळू बुचकळ्यात पडला. "कदाचित यमाची वेशभूषा केलेला हा कोणी मानव तर नसेल ना?" बाळुच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. मात्र खराखुरा तरणाबांड रेडा, विद्युत लहरींप्रमाणे वळवळणारा 'मृत्युपाश' पाहताच बाळुची खात्री पटली, हा साक्षात यमराजच आहे . रेड्यावरून खाली उतरुन यमराज चालत बाळुजवळ आला. बाळुच्या पाठीवर अलवार थोपटीत तो बाळुला म्हणाला, वेड्या, बायकोचा बैल झालायस तू." आता यमापुढे काय बोलावे हे बाळुला कळेना. उगीच आपण काहीतरी चुकीचे नकळत बोलायचो, आणि या यमाची 'सटकली' तर त्याच्या हातातला मृत्युपाश आपल्यावरच पडायचा असेही बाळुला क्षणभर वाटले. तरीही थोडा धीर करीत तो यमास म्हणाला," तू असे कसे काय म्हणू शकतोस यमा?" मात्र बाळुच्या प्रश्नावर यमराज चिडला नाही. तो बाळुला म्हणाला," तू बायकोला सांगायचंस की मी वडाची फांदी आणण्यापेक्षा तुम्ही बायका मिळून वडाकडेच का नाही  जात? तिथे  जाऊन  प्रत्यक्ष वडालाच फेरे घाला की..." यावर बाळू ताडकन म्हणाला, " यमा, तुला माहीत नाही, आजचा वडपौर्णिमेचा 'इव्हेंट' सेलिब्रेट करण्यासाठी साऱ्या  बायकांनी मिळून किती तयारी केलीय! फोटोसेशन,फोटोशुट सेल्फीज, रील्स, व्हिडीओज, बरेच काय काय ठरवलेय त्यांनी. आणि... हा संपूर्ण इव्हेंट त्या 'मिळून साऱ्याजणी' आमच्याच टेरेसवर  करणार आहेत. त्यासाठीच त्यांना वडाची मस्तपैकी फांदी हवीय." यमराज त्याला समजावीत म्हणाला, " अरे, आज तू एक फांदी तोडशील,तुझ्यासारखे अनेक 'सत्यवान' आज ठिकठिकाणी हजारो,लाखो फांद्या तोडतील. अशाने या वडाच्या झाडांचे काय होईल  रे ? कधी  याचा  विचार  केलायस  का ? वडासारखे भरपूर ऑक्सिजन सोडणारे दुसरे झाड या जंगलात तरी नसेल. पण तुम्ही सत्यवानांनी जर अशा प्रकारे एका दिवसाच्या इव्हेंट साठी बिचाऱ्या वडांना ओरबाडलात, त्यांना छाटलात, लुळे पांगळे, अधु केलात तर या झाडांनी दुःख तरी कोणाकडे व्यक्त करायचे रे?" आणि वर तुम्हीच परत बोंबलणार, पर्यावरणाचा समतोल बिघडतोय. पर्यावरणाचा ऱ्हास होतोय. ऋतुचक्र बिघडलेय, पृथ्वीचा विनाश अटळ आहे वगैरे वगैरे! बाळुला यमराजाचे म्हणणे पटले असावे. त्याची मान शरमेने खाली गेली. आता त्याची यमराजाच्या नजरेला नजर भिडविण्याची हिंमत झाली नाही. तो खालच्या मानेनेच, खालच्या स्वरात यमराजास म्हणाला," तुझे विचार योग्य आहेत. मलाही पटलेत. पण या बायकांना ते कसे पटवून सांगायचे? त्यांच्या आजच्या इव्हेंटवर पाणी फिरवायचे का?" त्याची पाठ थोपटीत यमराज म्हणाला," तू असे कर, इथे वडाखाली बसून मस्त आराम कर. तास दीडतास वाट बघून साऱ्या सावित्री इथे धावत येतील. त्याना वाटेल, तास दीडतास होऊन गेला. सत्यवान घराकडे नाही आला. नक्कीच सत्यवान संकटात आहे. सत्यवान यमाच्या तावडीत तर सापडला नाही ना? त्या साऱ्याजणींना येऊदेत इथे तुला शोधत. एकदा आल्या की करा म्हणावे इथेच वडपौर्णिमा." " होय यमा. मी आता असेच करतो. येऊदेतच त्यांना इथे. घालूदेत फेरे याच वडाला." असे म्हणत बाळुने हातातली कुऱ्हाड खाली ठेवली. वडाच्या मुळाशी जणु तो थपकन मारुनच बसला. यमराजाकडे वळून पाहत तो म्हणाला," तू सांगितलेस तसेच होऊदे. येऊदेत त्यांना." आता बाळुप्रमाणेच यमालाही हायसे वाटले. बाळुकडे पाहत मंद स्मित करीत आणि "तथास्तु!" म्हणत यम परत रेड्यावर स्वार झाला आणि दुसऱ्याच क्षणी अंतर्धान पावला. बाळू मात्र यमाच्या त्या पाठमोऱ्या आकृतीकडे एकटक पाहत राहिला.

## लहानपण देगा देवा





**कु. शमिका नयनेश मुलूख,
चंद्रनगर, ता. दापोली**

## साप्ताहिक सदर
# तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

**लेखिकेचा परिचय :**
**चित्रा नानिवडेकर या प्रथितयश लेखिका व संवेदनशील कवयित्री आहेत. समाजात वावरताना आपल्या अवती भवती दिसणाऱ्या, दैनंदिन जीवनात जगताना पावलोपावली संघर्ष करणाऱ्या स्त्रियांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न चित्रा नानिवडेकर आपल्या साप्ताहिक सदरातून करणार आहेत.**

## लग्नबंधन... ? की जंजाळ...!!! (भाग ३.अंतिम)

**(ईरा मुलीं लग्न बंधनात का पडत नाहीत किंवा का त्यापासून दूर असतात. ह्याबद्दल नवऱ्याशी बोलत असताना तो अविवाहित मित्राला मॅरेज कौन्सीलर शांता ताईंना भेटायला घेऊन येतो.)**

ईरा त्या दोघांची ओळख करून देते. आणि ताईंना म्हणते. "बरं का ताई आमच्या मंदारने लग्नाची एवढी धास्ती घेतलीये. आता तुम्हीच त्याला का ते विचारा."
मंदार जणू ह्या प्रश्नांचीच वाट बघत होता . त्याने सांगायला सुरुवात केली...
"मॅम आजकाल मुलींच्या अपेक्षा खूप वाढल्या आहेत. तुम्ही मला सांगा.. आम्हीसुद्धा शिक्षण घेऊन, करियर मध्ये स्थिरस्थावार होतो तेच लग्नाचं वय असतं ना? आमच्या आईवडीलांनी पण आमच्या उच्च शिक्षणासाठी कर्ज वगैरे काढलं असतं. मग लग्नाच्या बाजारात ह्यांना आमच्या स्वतंत्र घराची डिमांड, चारचाकी ची डिमांड, आई वडिल आजी आजोबा नकोत अशी डिमांड, असतात. पण फॉरीनला स्थायिक व्हायला उत्सुक असणाऱ्या मुलींना मात्र आमचे आईवडील एकत्र राहणारे पाहिजे असतात. म्हणजे आमच्या पेरेंट्सनी आधी स्वतःचा संसार करायचा. नंतर आमचा. तो सुद्धा परदेशात. मॅम एक मुलगी तर आली भेटायला तीच मुळी एवढी मोठी लिस्ट घेऊन. एकेक प्रश्न विचारून क्लेरिफाय करत होती. म्हणजे तिला तिच्या रेडिमेड फॉर्मेट मध्ये बसणारा जोडीदार असला तर आणि तरच ती होकार देणार."
ईरा ने उत्सुकतेने विचारलं
"मंदार...प्रश्न तरी काय होते तिचे?"
"वहिनी...नका विचारू. अहो भाजी कोणती आवडते पासून ते बेडशीट बदलण्याच्या डेट्स पण तिने ठरवल्या होत्या. त्यातले काही प्रश्न वास्तविक होते...तुमची देवा धर्माची मतं, शाकाहारी, मांसाहारी, बचत कशी करणार, कामांची वाटणी वगैरे..."
"नकार कोणी दिला तू की तिने?" ईरा च्या मिस्टरांनी हसत विचारले.

"अरे...मी पाचवा कॅन्डीडेट होतो त्या आठवड्यातला. अर्थात तिने कोणाला पसंत केले माहिती नाही.मॅडम मला तुम्हाला असं विचारायचं होतं एक मॅरेज कौन्सीलर म्हणून जास्तीतजास्त कोणत्या कारणांमुळे लग्न तुटतात."
शांताताई म्हणाल्या "अरे ते व्यक्ती सापेक्ष असतं. पण बऱ्याचदा माहेरच्या माणसांची ढवळाढवळ, जोडीदाराला असलेली व्यसनं, लग्न जमवताना अंधारात ठेवलेल्या बाबी ह्यामुळे बसलेला धक्का आणि त्यातून आलेली असुरक्षितता, जोडीदाराचा अपमान, लग्नातील मानपान अशी बरीच कारण असतात . अर्थात आजकाल खूप लहानसहान कारणं सुद्धा असतात.
मंदार मला एक सांग...तू आता आधुनिक, कमावता तरुण आहेस. वयाची 35 शी उलटलीये. आणि तू लग्नाची एवढी धास्ती घेतलीयेस. तुला भविष्यात एकटे पडल्या सारखं नाही वाटणार?"

"मॅडम कसं आहे ना ह्या ईरा आणि संतोष सारखं परफेक्ट कपल मिळालं तर करीन विचार. अन्यथा मी एकटाच सुखात आहे. निदान शेवटपर्यंत आई वडिलांना तरी सुखी करू शकेन. काल आलेली एखादी मुलगी त्यांना 'डस्टबिन' म्हणून हिणवायला लागली तर ते मला अजिबात आवडणार नाही. ज्या आईने हाताचा पाळणा करून मला वाढवलं, ज्या वडिलांनी प्रसंगी स्वतःच्या गरजा मागे ठेवून मला पाहिजे ते दिलं. त्यांना मी दूर ठेवून नक्कीच सुखी होणार नाही."
"बरोबर आहे. तुझ्या जागी मी असतो तरी असंच म्हटलं असतं. पण मंदार...तू म्हणतोस तसं आम्ही परफेक्ट कपल अजिबात नाही बरं. आमचीपण जबरदस्त भांडणं वगैरे होतात. अरे दोन भिन्न व्यक्ती मग ते आई मुलं असू दे, नाहीतर नवरा बायको असू दे. मतं मतांतर होणारच ना? पण आमच्या संसरात दोन गोष्टी आम्ही कटाक्षाने पाळतो त्या म्हणजे बारीकसारीक गोष्टीं बोलून सॉर्ट आऊट करायच्या... धूमसत ठेवायच्या नाहीत. आणि एकमेकांच्या फॅमिलीचा आदर करायचा. "
"मंदार आमच्या लग्नाचं ठरलं आणि आम्ही एक मताने ठरवलं लग्न रजिस्टर पद्धतीने करायचं, कोणतेच सोहळे नाही. ते पैसे आम्ही आमच्या संसारात वापरले. हे घर घेताना संतोषच्या बाबांनी एक मोठी रक्कम दिली तेवढीच माझ्या बाबांनी दिली. अर्थातच आम्ही दोघेही दोन्हीही पेरेंट्सना सांभाळतो. मध्ये माझ्या बाबांना हार्टचं दुखणं झालं. संतोष सुट्टी घेऊन हॉस्पिटल मध्ये राहिला."
"आणि माझ्या पॅरेलेसिस आईची सगळी सेवा ईराने आणि मी नोकरी सांभाळून केली. असं असतं साहजिवन."
"खरं आहे तुमचं...आजकाल तरुण तरुणी खूप वरवरच्या गोष्टींना आकारण महत्व देतात. लग्न म्हणजे आपल्या आयुष्याचा ईव्हेन्ट वाटतो त्यांना...जितके दिवस लग्न सोहळा लांबेल तितका त्यांना तामझाम करून मिरवणं म्हणजे इतिकर्तव्यता वाटते. मग ते लग्न टिकेल की नाही ह्याची पर्वा करत नाहीत." ईरा पोट तिडीकेने म्हणाली.
"ते तर आहेच ईरा. मला वेगळीच भीती वाटतेय.लग्न न करता लिव्ह इन मध्ये राहणारे असेच वाढत गेले तर आपली संस्कृती कशी टिकणार?" शांताताई म्हणाल्या.

**अर्थात हा सखोल विषय अभ्यासवा तेवढा कमीच ह्या मतावर त्यांचं एकमत झालं.**

**तुमची मतं आणि प्रतिक्रिया जाणून घ्यायला आवडेल.**





# अध्यात्म

ज्योतिर्विद
उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४



## 'उपवास'

वर्षाच्या बाराही महिन्यांमध्ये कोणत्या ना कोणत्या निमित्ताने उपवास हे व्यक्तीकडून केले जात असतात. आषाढ महिन्यापासून उपवासांच्या सणांची व्रतवैकल्यांची चळवळ सुरू होऊ लागते आणि या उपवासांचा फेरा वर्षभरात पूर्ण होत असतो. पुन्हा त्याची पुनरावृत्ती पुढे वर्षानुवर्ष होतच असते. आध्यात्मिक विषयानुषंगाने उपवासाबाबत समजून घेणे अत्यावश्यक आहे. यासाठी हा लेखप्रपंच.

'उप' म्हणजे जवळ आणि 'वास' म्हणजे राहणे किंवा बसणे. 'उपवास' म्हणजे 'जवळ बसणे' अर्थातच उपवास करणे म्हणजे 'सान्निध्यात राहणे' जवळीकता साधणे. एखाद्या शुभदिवशी देवाच्या, सत्पुरुषाच्या, त्रिकालज्ञानी विद्वान व्यक्तीच्या सानिध्यात राहणे होय. या दिव्यत्वाच्या सानिध्यात राहिले असता दिव्यत्वाच्या प्रभावाने आपल्या मन, आत्मा आणि शरीर यांना प्रगल्भता प्राप्त होते. ही प्रगल्भता प्राप्त होण्यासाठी उपवासाच्या कालदरम्यान आळस, झोप, पित्त विकार, वातविकार, चित्त विकार इत्यादी विकार उद्भवू नयेत यासाठी कमीत कमी आहार घेणे आवश्यक असते. अशावेळी धर्मशास्त्राने अशा पचनास हलके व सुलभ असणाऱ्या हविष्यांन्नांची यादी सांगितली आहे की, ज्यांच्या सेवनाने मल उत्पन्न न होता स्त्रावग्रंथींना पाझर आणणारी संप्रेरके उत्पन्न होतात आणि शरीरातील कोरडी गात्रे ओलावतात. यामुळे शारीरिक आरोग्य लाभते जे मन, आत्मा आणि देह यांना समृद्धी आणते. हविष्यांन्नांचा आहार हा हलका असल्यान सहज पचन होतो. याच्या पचनासाठी पचनेंद्रियांना ताण पडत नसतो. पचनेंद्रियांना विश्रांती मिळते जी आरोग्यासाठी अत्यावश्यक आहे. यानिमित्ताने नित्य आहारामध्ये बदल घडून येतो आणि तो घडावा हे उपवास कर्मात अपेक्षित असते.

दिवसभर काहीही न खाता फक्त पाणी पिऊन निराहार राहुन केलेला उपवास हा सर्वोत्तम उपवास. यामुळे पोटातील सर्व अवयवांना, पंचनेंन्द्रियांना उत्तम विश्रांती मिळून माणसाची कार्यक्षमता दुप्पट वाढते. हे कठीण वाटत असेल तर पातळ द्रवरूप पदार्थांचे सेवन करून द्रवाहार करावा. हे अवघड वाटत असेल तर फळांचा फलाहार करावा. तेही शक्य होत नसेल तर नेहमीच्या आहारात बदल करून पचनास सुलभ असणारे वरीच्या भातासारखे हविष्यान्न भक्षण करावे. मात्र हे सर्व कमीत कमी प्रमाणात करावे.

आठवड्याचा साप्ताहिक उपवास (आठवड्यातून एखादा वार), पंधरवड्याचा पाक्षिक उपवास (एकादशी, प्रदोष इत्यादी), महिन्याचा मासिक उपवास (संकष्टी, शिवरात्री इत्यादी), सहा महिन्याचा षाण्मासिक उपवास ( कर्क संक्रांत, मकर संक्रांत इत्यादी पर्वकाल), बारा महिन्याचा वार्षिक उपवास (जन्माष्टमी, महाशिवरात्री इत्यादी) अशाप्रकारे उपवासांचे चक्र आहे. यांपैकी प्रत्येकी एक उपवास माणसाने अगत्त्य करावा. उपवासाच्या दिवशी विविध उपक्रमांनी मनावर धार्मिक संस्कार करून घ्यावेत. यासाठी उपवासकाळात धार्मिक ग्रंथवाचन, श्रवण, मनन, चिंतन, भजन, कीर्तन, पूजन इत्यादी उपक्रम करावेत. आठवड्याभरात इतकेही उपवास करू नयेत की, ज्यामुळे पित्ताचा त्रास सुरू होऊन वाढेल. धार्मिक आचरण न करता मनाविरुद्धही उपवास करू नयेत कारण त्यामुळे पित्त वाढण्याची अधिक संभावना असते. उपवास व व्रत्ते यांच्या माहितीची पुस्तके बाजारात उपलब्ध असतात. त्यातील मार्गदर्शन घेऊन शास्त्रोक्त उपवास केले असता मुख्य देहाची शुद्धी होतेच त्याचबरोबर मुख्य देहाभोवतीचे वासनादेह, मनोदेह, कारणदेह इत्यादी देहांमध्येही शुद्धी प्रस्थापित होते. यामुळे वृत्ती स्थिर होते. मन, आत्मा आणि देह यांना शांती मिळते.

देहधारणेसाठी आवश्यक असणारे इंधन हे नेहमीच्या अन्नातून मिळत असते. उपवासाच्या दरम्यान हे इंधन नेहमीच्या अन्नातून मिळत नसल्यामुळे शरीरात दडून बसलेले आजारास कारण होत असलेले घातक जंतू ,अन्य विकार यांचा इंधन म्हणून वापर केला जातो. यामुळे देहातील जुनाट आजार घटत कमी कमी होत जातात. आरोग्य सुधारते. उपवासांचे प्रमाण अतिही होता नये. उपवासाचे प्रमाण अति झाले की अर्थात उपासमारी झाली की शरीरातील उपयुक्त पेशींचा इंधन म्हणून वापर होतो आणि पेशींच्या प्रमाणात घट होते व परिणामी पित्त प्रकोप, चित्तभ्रम, उष्णतेच्या व्याधी, त्वचा विकार व अन्य आजार निर्माण होऊन बळावतात. शास्त्रोक्त उपवास केल्याने अन्नमार्गातील आतड्यांच्या आतील बाजूंवर साठलेले निरुपयोगी थर विरून शितल होऊन शौचावाटे बाहेर पडतात. आतडी स्वच्छ होऊन अधिक कार्यक्षम बनतात. पुरेसे किंवा थोडे अधिक पाणी पिल्यानेही आतडी स्वच्छ आणि कार्यक्षम होतात. निराहार उपवासाने हे अधिक साध्य होते.

उत्क्रांतीवादाचा नियम सांगतो की, मुख्य देहाभोवतीच्या वासना देह, मनोदेह, कारणदेह इत्यादी देहांची शुद्धी होत गेल्यास पुढील जन्म अधिकाधिक चांगल्या अवस्थेत प्राप्त होतात आणि अखेर परमार्थाची प्राप्ती होते. उपवासाचे शास्त्रोक्त तंत्र साधल्याने मानवी जन्मात आध्यात्मिक उन्नती साधून परमार्थिक प्राप्ती साधता येते. निसर्गाच्या नियमित प्रक्रियांशी आपली जवळीक साधते. ही जवळीक पिंड आणि ब्रह्मांड यांच्यातील समन्वय साधते.

साधारणतः पन्नाशीनंतर नवपेशी निर्माण होण्याची क्षमता ही कमी कमी होत जाते. अशा अवस्थेत अधिक उपवासांची सांगता करून एकादशीचा एखादाच उपवास करावा असे शास्त्र ग्रंथांतून सुचित केले आहे.

## सोनेरी दुनिया



श्री. श्रीराम शेटये.
नालासोपारा.

### राज कपूर - नर्गिस प्रेमकहाणी



मौसमी चटर्जी ह्या भारतीय चित्रपटसृष्टीतील एक नामांकित अभिनेत्री आहेत. त्यांचा जन्म 26 एप्रिल 1953 रोजी पश्चिम बंगालमध्ये झाला. त्यांच्या अभिनयातील नैसर्गिकता आणि आकर्षणामुळे त्या पटकन रसिकांच्या मनात घर करू लागल्या.

मौसमी चटर्जी यांनी त्यांच्या करिअरची सुरुवात बंगाली चित्रपटांमधून केली. 1967 साली आलेल्या "बालिका बधू" ह्या चित्रपटामुळे त्या घराघरांत पोहोचल्या. त्यांच्या अभिनयामुळे त्या चित्रपटाला प्रचंड यश मिळाले आणि त्यांना ओळख मिळवून दिली.

हिंदी चित्रपटसृष्टीत मौसमी चटर्जी यांनी "अनुराग" (1972) ह्या चित्रपटाद्वारे पदार्पण केले. या चित्रपटात त्यांच्या अभिनयामुळे त्या सर्वांच्या आवडत्या अभिनेत्री बनल्या. पुढे त्यांनी "रोटी, कपडा और मकान", "मंजिल", "सफर", "कांचा चांद" आणि "उधार का सिंदूर" यांसारख्या अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये भूमिका केल्या.

मौसमी चटर्जी यांच्या अभिनयातील विशेषता म्हणजे त्यांची नैसर्गिकता. त्या आपल्या भूमिकांना जीवंत करतात आणि प्रत्येक भूमिकेत वेगळेपण आणतात. त्यांच्या अभिनयामुळे त्यांनी चाहत्यांच्या मनात एक विशेष स्थान मिळवले आहे. त्यांनी अनेक दिग्गज अभिनेत्यांसोबत काम केले आहे, जसे की अमिताभ बच्चन, राजेश खन्ना, धर्मेंद्र, जीतेंद्र इत्यादी. त्यांच्या अभिनयातील कौशल्यामुळे त्या सर्वांशी सहज जुळून गेल्या आणि त्यांचे चित्रपट प्रेक्षकांनी भरभरून पसंत केले.

मौसमी चटर्जी यांनी त्यांच्या कारकिर्दीत विविध प्रकारच्या भूमिका केल्या आहेत. त्यांनी विनोदी, गंभीर, रोमांटिक आणि सामाजिक संदेश देणाऱ्या चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्यांच्या अभिनयातील वैविध्यपूर्णता आणि सक्षमता यामुळे त्या कायमस्वरूपी आठवणीत राहतील.

व्यक्तिगत आयुष्यात मौसमी चटर्जी यांचे लग्न जयंत मुखर्जी यांच्याशी 1972 साली केले. जयंत मुखर्जी हे सुप्रसिद्ध संगीतकार हेमंत कुमार यांचे पुत्र आहेत. त्यांना दोन मुली आहेत, पायल आणि मेघा. आपल्या व्यावसायिक जीवनासोबतच मौसमी यांनी कौटुंबिक आयुष्यही समतोल ठेवले आहे. त्यांच्या कौटुंबिक जीवनातही त्या एक आदर्श आई आणि पत्नी आहेत. आजही मौसमी चटर्जी यांची ओळख एक कुशल अभिनेत्री म्हणून केली जाते. त्यांनी आपल्या अभिनयाने चित्रपटसृष्टीत एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या अभिनयाची जादू अजूनही प्रेक्षकांच्या मनावर राज्य करत आहे. त्यांच्या कार्याला अभिवादन आणि त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा!




## बापाचं काळीज

सौ. गौरी यशवंत पंडित, मुंबई

मला लहानपणापासूनच असं वाटत गेलं की बाबांना माझ्यापेक्षा माझी ताई जास्त आवडते कारण ती पहिली बेटी होती. त्या अगोदरही आम्हाला एक भाऊ झाला होता परंतु तो लहान वयातच गेला, त्यानंतर जन्मली ती माझी बहीण. ती बाबांची फार लाडकी होती . मला नातेवाईकांनी असं सांगितलं होतं की ,जेव्हा माझी आई माझ्या वेळेला गरोदर होती तेव्हा माझ्या बाबांना मुलगा अपेक्षित होता कारण पहिल्यांदा त्यांचा मुलगा गेला असल्यामुळे त्यांना तसं वाटणं सहाजिकच होतं. परंतु जेव्हा दुसरे बाळही मुलगीच आहे कळलं तेव्हा त्यांनी माझ्याकडे बघितलं नव्हतं असं मला सांगण्यात आलं.वारंवार हे ऐकून असल्यामुळे का असेना माझ्या मनात बाबांविषयी थोडीशी अढीच निर्माण झाली परंतु रोजच्या व्यवहारात किंवा बाबांच्या वागण्या बोलण्यात मला असं कधी जाणवलं नाही.

मला सारखं असं वाटत राहिलं की मी जसं बाबांवरती प्रेम करते तेवढे प्रेम माझ्यावर करत नाही खरं सांगायचं तर मला आई पेक्षा बाबा जास्त आवडायचे याची कारण म्हणजे आईची कडक शिस्त .बाबा खूप प्रेम करत, लाड करत. त्यांनी कधीच माझ्या वरती हात उगारला नाही. तसं म्हटलं तर आईनेही माझ्यावरती कधी हात उगारला नव्हताच .पण नेहमी काही खाताना मोठ्या बहिणीला विचारलस का? तिच्यासाठी ठेवले आहेस ना ? असं विचारून माझ्या मनात स्वत:साठी प्रश्न निर्माण करून ठेवत.

एकदा माझ्या हाताला कसला तरी डाग त्यांना दिसला लगेच कपडा ओला करून आले आणि माझा हात पुसू लागले डाग साध्या खडूचा असल्यामुळे लगेचच गेला परंतु त्या दोन मिनिटांमध्ये त्यांना इतकं धास्तावलेले मी पाहिलं असं मी त्यांना कधीच बघितलं नव्हतं. डाग गेल्यावर मला म्हणाले देवाच्या पाया पड तुला काही होता कामा नये.

तेव्हा नुकतंच एकदा आमच्या घरापासून बरंच लांब एक नवीनच हॉटेल आले होते. त्यातली पाव भाजी खूप फेमस होती असे मी ऐकलं होतं. एका रविवारी सकाळी मी बाबाला माझ्यासाठी पावभाजी घेऊन ये असं सांगितलं. (आम्ही बाबांना एकेरीच हाक मारीत असू) बाबा गेले. पण बराच वेळ झाला, बाबा परतलेच नाही. मी पाव भाजीची वाट बघत होते .बाबा येण्याला जो काळ लागणार होता त्यापेक्षा तब्बल दोन तास उशीरा आले मी विचारले," बाबा, काय झालं ? इतका उशीर कसा झाला ?' तर म्हणाले ,"अगं, मी तुझ्यासाठी पावभाजी आणली पण काय झालं कळलं नाही. कुठेतरी रस्त्यातच पडली किंवा मी विसरलो कुठेतरी. "
मी म्हटलं, "बाबा, तुला कुठे, कधी समजले की आपल्याकडे पिशवी नाहीये ते? "
बाबा. म्हणाले ,"अगं ,मी घरापर्यंत आलो होतो, अगदी आपल्या गेटपर्यंत पोचलो होतो आणि माझ्या लक्षात आलं की माझ्या हातात पाव भाजीचे पार्सल नाही., मग मी. परत गेलो ,ज्या ज्या ठिकाणी गेलो होतो ,त्या त्या सर्व ठिकाणी मी गेलो देवळामध्ये ,लायब्ररीमध्ये सर्व ठिकाणी गेलो. इस्त्री रिपेअर करायला दिली तिथे सुद्धा गेलो .. .पण मला कुठेच पावभाजीचे पार्सल दिसले नाही . शेवटी मी त्या हॉटेलवर परत गेलो आणि तुझ्यासाठी दुसरी पावभाजी घेऊन आलो, रविवार असल्याने गर्दी झाली होती. मला तर आत बसायला ही मिळाले नाही, बाहेरच उभा राहिलो.बनवायला पण वेळ लागतोच ना, आणि पार्सल ला तर अजून वेळ. तुला promise केलं होतं ना! हे घे खा, गरम आहे तोवर मजा!' ते ऐकून माझ्या डोळ्यात पाणी आलं .

मला पावभाजी मिळावी म्हणून तो माणूस उन्हातान्हात एवढा लांब चालत जाऊन परत संपूर्ण रस्ता मागे आला होता, तो म्हणू शकला असता की, 'पावभाजी हरवली ,जाऊ दे, आज तुझ्या नशिबातच नव्हती! पण त्यांनी असं केलं नाही .



# सरकारी योजना/नोकरी

## रोजगार हमी योजना महाराष्ट्र अंतर्गत विविध कामे

राज्यातील ग्रामीण भागातील अकुशल कामगारांना रोजगार उपलब्ध नसतात त्यामुळे त्यांना उदरनिर्वाहासाठी खूप साऱ्या समस्यांचा सामना करावा लागतो तसेच पावसात रोजगाराची कामे देखील उपलब्ध नसतात त्यामुळे अशा कामगारांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी रोजगार हमी योजना महाराष्ट्र अंतर्गत विविध कामे हाती घेण्यात येतात.

**रोजगार हमी योजना महाराष्ट्र यादी खालीलप्रमाणे -**

- समुदायासाठी व्हायर क्रेट (गॅब्रियन) स्पुअर बांधकाम करणे
- समुदायासाठी दगड स्पुअर बांधकाम करणे
- समुदायासाठी मातीच्या स्पूरचे बांधकाम करणे
- समुदायासाठी व्हायरल क्रेट (कॅबियन) स्पुअर दुरूस्ती करणे
- समुदायासाठी दगड स्पुअर दुरूस्ती करणे
- समुदायासाठी मातीची स्पुअर दुरूस्ती करणे
- वैयक्तिक लाभासाठी लेवल बेंच बाधणे
- वैयक्तिक लाभासाठी जमिनीवरती बेंच बाधणे
- समुदायासाठी लेवल बेंच टेरेस बांधणे
- समुदायासाठी जमिनीवरती बेंच टेरेस बांधणे
- वैयक्तिक लाभासाठी अझोला लागवडीसाठी साचा (अझोलासाठी खड्डा) बांधणे.
- समुदायासाठी अझोला लागवडीसाठी साचा (अझोलासाठी खड्डा) बांधणे.
- समुदायासाठी अझोला लागवडीसाठी साचा (अझोलासाठी खड्डा) दुरूस्ती करणे.
- वैयक्तिक लाभासाठी जैविक खत निर्मितीसाठी साचा तयार करणे.
- गटासाठी जैविक खत निर्मितीसाठी साचा तयार करणे.
- समुदायासाठी जैविक खत निर्मितीसाठी साचा तयार करणे.
- समुदायासाठी जैविक खत निर्मितीसाठी साचा दूरूस्ती करणे.
- समुदायासाठी शेत तळे बांधणे
- समुदायासाठी शेत तळे दुरूस्ती करणे.
- समुदायासाठी शेत तळे नुतनीकरणे करणे.
- समुदायासाठी जल शोषणासाठी न्ट्रेच बांधणे.
- समुदायासाठी ग्रामपंचायत इमारत बांधणे
- ग्रामपंचायती / पंचायत इमारती बांधकाम
- भारत निर्माण सेवा केंद्र इमारती बांधणे
- अंगणवाडी इमारतीचे देखभाल व दुरुस्ती करणे
- ग्रामपंचायती / पंचायत समिती इमारतींची देखभाल व दुरुस्ती करणे
- समुदायासाठी भारत निर्मिती सेवा केंद्राची इमारत देखभाल व दुरुस्ती करणे
- महिला बचतगट व बचतगट फेड्रेशन इमाराात बांधकाम करणे
- स्मशान शेड बांधकाम
- स्मशान शेड देखभाल व दुरुस्ती करणे
- समुदायासाठी कुलवर्ट /रस्त्याच्या एकबाजून दुसरे बाजूने गटार चे बांधकाम करणे
- समुदायासाठी गटार /रस्त्याच्या एकबाजून दुसरे बाजूने गटार चे देखभाल व दुरुस्ती करणे
- समुदायासाठी किनारपट्टीचे वादळ वाऱ्यापासुन संरक्षणाकरीता गटार बांधकाम करणे
- समुदायासाठी अंतर्गत वादळ वाऱ्यापासुन संरक्षणाकरीता गटार बांधकाम करणे
- समुदायासाठी वादळ वाऱ्यापासुन संरक्षणाकरीता वळण गटार बांधकाम करणे
- समुदायासाठी किनारपट्टी संरक्षण गटाराचे देखभाल व दुरुस्ती करणे
- समुदायासाठी अंतर्गत वादळ वाऱ्यापासुन संरक्षणाकरीता देखभाल व दुरुस्ती करणे
- समुदायासाठी डायव्हर्शन संघर्ष पाणी नाल्याची व्यवस्था देखभाल व दुरुस्ती करणे
- समुदायासाठी वादळ वाऱ्यापासुन संरक्षणाकरीता उगडी गटारे बांधणे
- समुदायासाठी वादळ वाऱ्यापासुन संरक्षणाकरीता उगडी गटारे देखभाल व दुरुस्ती करणे
- वैयक्तिक लाभासाठी मासे सुकवणेसाठी ओटा बांधणे
- समुदायासाठी लाभासाठी मासे सुकवणेसाठी ओटा बांधणे
- समुदायासाठी मासे सुकवणेसाठी ओटा देखभाल व दुरुस्ती करणे
- समुदायासाठी डांबर रस्ता तयार करणे
- समुदायासा खडीकरण रस्ता तयार करणे
- समुदायासाठी इंटर-लॉकिंग सिमेंट ब्लॉक / टाईल्स रस्ता तयार करणे
- समुदयासाठी दगडपासून समोच्च बांध तयार करणे
- समुदयासाठी मातीपासून बांध तयार करणे
- समुदयासाठी गारगोटीपासून बांध तयार करणे
- समुदयासाठी दगडापासून बांध तयार करणे
- समुदयासाठी मातीपासून तयार केलेले बांध दूरुस्ती करणे
- समुदयासाठी गारगोटी तयार केलेले बांध दूरुस्ती करणे
- समुदयासाठी दगडापासून तयार केलेले बांध दूरुस्ती करणे
- समुदायासाठी पडीक जमिनीमध्ये रेशीम उत्पादनाकरीता एकत्रित तुती झाडाची लागवड करणे
- वैयक्तिक लाभासाठी पडिक जमिनीतील वृक्ष लागवड
- सीमा रेषा वरील वैयक्तिक वृक्षारोपण
- वैयक्तिक लाभासाठी किनारपट्टीच्या लगत वृक्षारोपण
- पडिक जमिनीतील वैयक्तिक लाभासाठी जंगली वृक्षांची लागवड करणे
- वैयक्तिक स्वरुपाच्या निवाऱ्यासाठी वृक्षालागवड
- वैयक्तिक स्वरुपाच्या किनाऱ्या लगतच्या निवाऱ्यासाठी वृक्षालागवड
- वैयक्तिक स्वरुपाच्या एकत्रित फळबाग लागवड
- पडिक जमिनीवरील वैयक्तिक स्वरूपाची एकत्रित फळबाग लागवड
- वैयक्तिक स्वरूपाची शेती विषयक झाडाची लागवड
- वैयक्तिक स्वरूपाची पडिक जमिनीतील शेती विषयक झाडाची लागवड
- वैयक्तिक स्वरूपाची जंगली झाडाची लागवड
- वैयक्तिक स्वरूपाची पडिक जमिनीवरील जंगली झाडाची लागवड
- वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावरती एकत्रित तुतीची लागवड
- वैयक्तिक लाभार्थ्यांच्या पडिक शेतावरती एकत्रित तुतीची लागवड
- वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावरती एकत्रित बायोड्रेनेज झाडाची लागवड करणे
- वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावरती एकत्रित पडीक जमिनीवरती बायोड्रेनेज झाडाची लागवड करणे
- वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावरती निवाऱ्याकरिता झाडाची लागवड करणे
- वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेताच्या सीमा भागावरती निवाऱ्याकरिता झाडाची लागवड करणे
- समुदायासाठी कालव्याच्या कडेला फळबाग लागवड करणे
- समुदायासाठी वनीकरण वृक्षांची सीमा रेषेत वृक्षारोपण करणे
- समुदायासाठी बंधाऱ्याच्या कडेला वनीकरण वृक्षांची सीमा रेषेत वृक्षारोपण करणे
- समुदायासाठी वनीकरण वृक्षांची सीमा रेषेत वृक्षारोपण
- समुदायासाठी वनीकरण वृक्षांच्या रस्तेच्या कडेला वृक्षारोपण करणे
- समुदायासाठी वन वृक्षांची किनारपट्टीच्या कडेला वृक्षारोपण करणे
- समुदायासाठी निवाराकरीता वृक्षांची सीमा रेषेत लागवड करणे
- समुदायासाठी निवाराकरीता वृक्षांचे रस्तेच्या कडेला वृक्षारोपण करणे
- समुदायासाठी किनार्याच्या निवाऱ्याकरिता किनारपट्टीच्या लगत वृक्षारोपण करणे
- समुदायासाठी पडिक जमिनीती फळझाडाची लागवड करणे
- समुदायाचे अधिकृत इमारत आवारात शेती वनीकरण वृक्षांचे ब्लॉक वृक्षारोपण
- समुदायासाठी शेती वनीकरण वृक्ष किनारपट्टीवर एकत्रित वृक्षारोपण करणे
- समुदायासाठी त्यांच्या शेती मध्ये त्याचे वनीकरण वृक्षरोपण करणे
- समुदायासाठी पडिक शेतीमध्ये वनीकरण वृक्षांची एकत्रित वृक्षारोपण करणे
- समुदायासाठी सरकारी इमारत आवारात वृक्षारोपण करणे
- समुदायासाठी वन वृक्ष किनारपट्टीवर एकत्रित लागवड करणे
- समुदायासाठी त्याचे शेतामध्ये वृक्षारोपण करणे
- समुदायासाठी वनराई वृक्षांची एकत्रित लागवड करणे
- समुदायासाठी वनीकरण वृक्ष वापरासाठी किनारपट्टी वर वनीकरण करणे
- वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी वनीकरण वृक्ष वापर पडीक वृक्षारोपण वनीकरण करणे
- वैयक्तिक रोपवाटिका
- सार्वजनिक रोपवाटिका
- समुह रोपवाटिका
- वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी मातीपासून शेत बांधबंधिस्ती
- वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी गारगोटीपासून शेत बांधबंधिस्ती
- वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी दगडापासून शेत बांधबंधिस्ती
- वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी मातीपासून समोच्च बांध तयार करणे
- वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी गारगोटीपासून समोच्च बांध तयार करणे
- वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी दगडपासून समोच्च बांध तयार करणे
- वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी मातीपासून बांध तयार करणे
- वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी गारगोटीपासून बांध तयार करणे
- वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी दगडापासून बांध तयार करणे
- समुदयासाठी मातीपासून शेत बांधबंधिस्ती
- समुदयासाठी गारगोटीपासून शेत बांधबंधिस्ती
- समुदयासाठी दगडापासून शेत बांधबंधिस्ती
- समुदयासाठी मातीपासून समोच्च बांध तयार करणे
- समुदयासाठी गारगोटीपासून समोच्च बांध तयार करणे

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862






## बाबल्याचा ठरला....

रीना पास्ते परब
सावंतवाडी

बाबलो सुम्या आतेच्या घराक कॉलेजात आसताना कदी इल्लो. हाली सालाक सुम्या आतेच्या घरची वाट त्याका म्हायतीच नाय होती. बाबल्याचो चुलतो बाबल्याक आज सुम्या आतेच्या न्हानग्या चडवाक दाखवच्या निमतान घेवन इल्लो.

सुम्या आतेच्या घरातली सगळीच वळयत यवन बाबल्याक बगून जाय होती. झिलमानूस हडे तडेचे वळखी सांगान पावन्या पैकाचे गजाली करी होते. बाबल्याची चुलती वळयतसून उठान होवऱ्यात गेली. तिना घरातसून भायर पडताना चुन घालून घावने काडललेन, ते हाडून तिना सुम्या आतेच्या हातीत दिलेन. हळूच तिना आरश्याफुड्यात तयारी करणाऱ्या पोरग्याक बगल्यानं. बगूक इलव ता ह्याच पोरग्या आसतला ह्या तिका कळला. पोरग्याक बगून ती खुश जाली. बाबल्याक सोभणारा पोरग्या आसा.

"रवळनाथा ही सोरगत जुळाने रे बाबा... बाबल्यान पोरग्या पसन केल्यान तर तुका गोडगिरास ठेयतलय..." मनातल्या मनात तिना असा हुनत नजारभरून पोरग्या बगून घेतलेन. ती हसतच वळयत इली. बाबल्याक बगलेन तर बाबलो शांत होतो.

"चाय पानी जाला... गजाली जाले आता पोरग्याक यवने भायर..." बाबल्याच्या चुलत्या वांगडा इल्ल्या मोवल्यान हुतल्यान. सुम्या आते घरात गेली. सगळी तयारी जाली काय बगून तिना भायर बोलयतत हुनान सांगला.

"बाय भिया नको... काय ईचारल्यानी तर सोयन सांग हा..." सुम्या आतेन बायक धीर दिलो. बाय वळयत इला तरी बाबलो खालते मान घालून होतो. बायन बाबल्याक बगल्यान तरी दुकू बाबलो वरते मान करीना. बाबल्याच्या चुलत्यान बाबल्याक पोरगी सोयन बगून घे असा हसतच हुतल्यार बाबल्यान नजारा वर केली. बायच्या साधेपणाक बाबलो बगीत रवलो. पोरगी बगून जाली तशी मंडळी जावक भायर पडली. घराकडे जावन निरोप कळयतव हुनान तात्पुरती त्यांका सांगला.

बाबल्यान घरात पाय ठेयतुकशिनी आवशीन चवकशी सुरू केली. बाबलो काय बोलाना तशी तेची चुलती सगळा सांगाक लागली.
"बाबल्याक पोरग्या आवडाक नाय हा... आमी नको हुनाया..." शेवटी तिना मुद्दम असा हुतलेन. त्यावर बाबलो पटकन बोललो.
"कोणी सांगला माका आवडाक नाय...?" ह्या आयकान सगळीच हसाक लागली. बाबल्याच्या चूलतेन त्याच्या मनातला बरोब्बर भायर काढलेन. बाबलो उठान आपले खोलयेत गेलो. बाबल्याची आवस देवाक हात जोडून हसत हसत आता फुडल्या तयारीक लागा व्हया हुनाक लागली....



## निसर्गाकडे चला....



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

काल वडपौर्णिमेचा काय करायचा म्हणान ठरवूक सगळ्ये बायका आमच्याकडे इले. आम्ही बाय अशे धा बारा जणी दरवर्साक वडपौर्णिमा करतव. इल्या इल्याच सावतिनीन सांगान टाकल्यान, वडाच्या खांदयेचा सोडून बोला. खांदयेचा टेंशन घेव नको. मी आताच आमच्या ह्यांका बजावून इलंय. सांचेक म्हशी हाडूक तळ्यार जाशात तेव्हा येतना एक सुमाराकशी वडाची खांदी घेव्न येवा." आम्ही बाय ल्हानपणापासून बघतव, आमची आयेपण अशीच बाबांक वडाची खांदी आणूक सांगायची. बाबा खांदी घेव्न यायचे नि ती खांदी तुळशीच्या बाजूक रुपून ठेवायचे. मग आमची आये, काकी वगैरे त्याच खांदयेभोवती फेरे घालून वडपौर्णिमा करायची. तेव्हाची वडपौर्णिमा म्हणजे अशी घरातल्या घरात. आतासारखे इव्हेंट नसायचे.

आता सावतीनीन सांगल्यान इतक्यात आमची सासुबाय लुगडा सावरीत फुडे येवन बसली. आता तिका काय फाटकन उठा बसाक येताहा? तरी ती वळयतना उठान आमच्या मंडळात येवन बसली. बसल्या बसल्या तिना विषय मांडल्यान," आतापर्यंत आमी पण वडाची खांदीच पुजी व्हतंव. पण आता मी रोज पेपर वाचतय, टि.व्ही बघतंय, ता काय ता व्हाटस ॲप पण बघतय. ह्या सगळा बघतना माका याक सुचला ता तुमका सांगतंय. कालच आशाच्या स्टेटसला एक व्हिडिओ बघलंय. आता बदलत्या काळाची गरज ओळखून आपण आपले पद्धती बदलूक व्हये असा माका वाटता. पुर्वीच्या काळात वडाची झाडा भरपूर व्हती. झाडांचो काय तोटो नाय व्हतो. पण आता आपण बघताव ना, गाव आसो की शहर, झाडा पेडा दिवसेंदिवस कमी होयत चलली हत. डोंगरच्या डोंगर उजाड करून बंगले होतत. आता फुडचो काळ लय वायट आसा. दिवसेंदिवस माणूस क्रूर आणि असंवेदनशील बनत चललो आसा. त्यामुळाच आता पुर्वीसारखी झाडा पेडा, जंगला दिसनत नायत. आणि, आता रानावनात, गावात पुर्वीसारखे वड तरी खय ऱ्हवले आसत?

वडपौर्णिमेच्या निमित्तान जर अशी वडांची तोड झाली, खांदयेंची छाटणी झाली तर आता जीव जीव म्हणान आसत तेदेखील वड फुडच्या काळात नायशे होतले. तेव्हा, मी असा म्हणतय, वडाचे खांदये तोडून आणण्यापेक्षा तुमीच वडाकडे जावा. त्यानिमित्तान वडाकय बरा वाटात. वडाखालची साफसफाई होयत. वड लय शोभून दिसात. वडाचे खांदयेय सहीसलामत वाचतीत आणि तुमचो सणय साजरो होयत. आपले पुर्वज काय येडे नाय व्हते. वडाची खांदी तोडून आणण्यापेक्षा वडाकडे जावा. निसर्गाकडे जावा. निसर्गाची कत्तल करण्यापेक्षा निसर्ग वाचवा. निसर्गाशी दोस्ती करा. निसर्गाची पूजा करा. उद्या वडपौर्णिमा कशीय साजरी करा. आनंद देवा, घेवा. पण बिचाऱ्या वडाचे हात पाय तोडू नका. माका ह्याच सांगाचा व्हता. ह्योच माझो विषय व्हतो." सासुबायन असा लेक्चर दिल्यार सावतिनीसकट सगळेजणी एकमेकाच्या तोंडाकडे बघूक लागले. सगळ्यांनी एकमेकाकडे बघून डोळ्यांच्या खुणांनीच कायतरी ठरवल्यानी. सावतिनीन मोबाईल हातात घेतल्यान. आमच्याकडे बघीत ती म्हणाली," आईनु, आमचे डोळे उघडलास. वायच थांबा. आमच्या ह्यांका फोन लावतय. " हॅलो, ऐका. मघाशी मी सांगलय तशी वडाची खांदी तोडून नको आणू तुम्ही. आमचा प्लानिंग बदालताहा. आता उद्या आम्ही सगळ्ये बायकाच वडाकडे जातलंव. वडाकडेच वडपौर्णिमा करतलव... ठेवा."






# बटाट्याचे वडे



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

पावसाळा सुरु झाला आहे. बाहेर पडणारा पाऊस आणि त्याबरोबर गरम गरम तळलेल्या बटाटवड्यांचा स्वाद घरात बसून आखावा यासाठी आजची हि पाककृती

साहित्य:

- ४ मोठे बटाटे (उकडून, सोलून व कुस्करून घ्यावे)
- १ कांदा (बारीक चिरलेला)
- २-३ हिरव्या मिरच्या (बारीक चिरलेल्या)
- १ इंच आलं (किसलेलं)
- २-३ लसूण पाकळ्या (किसलेल्या)
- कोथिंबीर (बारीक चिरलेली)
- १ टीस्पून हळद
- १ टीस्पून मोहरी
- १ टीस्पून जिरे
- १०-१२ कढीपत्ता पानं
- मीठ चवीनुसार
- बेसन पीठ
- तेल (तळण्यासाठी)

कृती:

1. एका पॅनमध्ये तेल गरम करावे. त्यात मोहरी, जिरे, कढीपत्ता टाकून तडतडू द्यावे.
2. त्यात कांदा, हिरवी मिरची, आलं-लसूण पेस्ट टाकून चांगलं परतावे.
3. हळद टाकून, कुस्करलेले बटाटे, कोथिंबीर आणि मीठ टाकावे. सर्व साहित्य एकत्र करावे.
4. मिश्रण थंड झाल्यावर छोटे गोळे करून त्याचे वडे तयार करावे.
5. बेसन पीठात पाणी टाकून घट्ट घोळ करावा. त्यात मीठ आणि हळद टाकावी.
6. वड्यांना बेसन घोळात बुडवून गरम तेलात तळावे. दोन्ही बाजूंनी सोनसळी रंग येईपर्यंत तळावे.
7. चटणी किंवा सॉस सोबत सर्व्ह करावे.



# मालवण चैतन्यचे chef प्रथमेश कुलकर्णी खाऊ घालणार अस्सल मालवणी पाककृती!

"माणसाच्या मनात शिरण्याचा मार्ग पोटातून जातो" असं म्हणतात. एखाद्या माणसाला खाण्यातून जिंकलं तर मनाने जिंकणं फारसं कठीण नसतं. या सूत्राने गेली ३० वर्षांपासून वैविध्यपूर्ण मालवणी रुचकर-लज्जतदार पदार्थांवर खाद्यसंस्कार करून मालवणी खाद्यसंस्कृतीचा समृद्ध वारसा जोपासणाऱ्या सुरेखा व नितीन वाळके यांनी जातीवंत खवय्यांच्या मनात अव्वल स्थान पटकावले आहे. त्यांनी बनवलेल्या मालवणी पदार्थांची चव चाखण्यासाठी 'चैतन्य' या खाद्यगृहात खवय्यांची दररोज झुंबड उडत असते. 'चैतन्य' मधील मालवणी पदार्थांचा लौकिक केवळ मुंबई, महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून तो देशासह जगभरातील खाद्यप्रेमींच्या जिव्हाळ्याचा बनला आहे. 'मालवणी जेवणाचा ट्रेण्ड सेटर असलेल्या लोकप्रिय 'चैतन्य'च्या स्वागतासाठी थेट 'चेन्नई'चे 'रेन ट्री' हे पंचतारांकित हॉटेल रेड कार्पेट घेऊन सज्ज झाले आहे. तामिळनाडूच्या चेन्नईतील अस्सल खवय्यांना मालवणी पदार्थांची खरी चव २५ जुन ते ३० जून या दिवसात चाखता येणार आहे. "The Taste of Malvan" या नावाने 'रेन ट्री' या तारांकित हॉटेलमध्ये 'मालवणी खाद्य महोत्सवाद्वारे 'चैतन्य'च्या सर्वेसर्वा सुरेखा वाळके आणि नितीन वाळके, चैतन्य व्हेंचर्सच्या मार्केटिंग व संशोधन प्रमुख सायली वाळके, मालवण चैतन्यचे chef प्रथमेश कुलकर्णी हे चेन्नईतील खवय्यांना मालवणी पाककृती खिलवणार आहेत.

३० वर्षांपूर्वी मालवण सारख्या छोट्याश्या गावात सुरेखा व नितीन वाळके यांनी चैतन्य अस्सल मालवणी ची सुरवात केली. मालवणी जेवण तेव्हा आजच्या सारखा सर्वश्रुत नव्हत. ते घरगुती पद्धतीचे जेवण हेच त्याच वर्णन. हे घरगुती जेवण वाढणाऱ्या खानावळी कधीच गावाची वेस ओलांडू शकल्या नाहीत. एकेकाळी मालवणमध्ये येणाऱ्या कित्येक लोकांना खाऊ घालणाऱ्या या खानावळी बंद पडत जाण्याचा तो काळ होता. अश्यातच चैतन्यची स्थापना झाली ती 'अस्सल मालवणी भोजनगृह' अश्या caption खाली. तेथ पासून ते आजपर्यंत चैतन्यची ओळख अगदी ब्रँडिंग पासून ते मेन्यू पर्यंत मालवणी जेवणाचे ट्रेण्ड सेटर अशीच राहिली आहे. आज मालवणी म्हटलं कि अस्सल हे विशेषण सहजच वापरल जातं आणि हे विशेषण जनमानसात रुजविण्याचं पूर्ण श्रेय चैतन्यला जात यात तिळमात्र हि शंका नाही.

घरच्या स्वयंपाक घरातुन कधीच बाहेर न येऊ शकणाऱ्या पाककृतींना व्यावसायिक दृष्ट्या ग्राहकांपर्यंत यशस्वीपणे पोहोचवण्यात 'चैतन्य आजही अव्वलच आहे. तिरफळ घातलेलं माश्याच तिखलं, माश्याच्या जेवणाबरोबर पाल्याची भाजी, कुळिथाची पिठी, शिरवाळे, नाचणीचा हलवा, चिकनची सुक्की सागोती, ओल्या काजूची उसळ, आंब्याचं रायतं, कुयरीची भाजी आणि तव्यावर कमी तेलात भाजलेले मासे - अश्या अनेक अस्सल मालवणी पदार्थांची चव चैतन्यने जगाला चाखवली; आणि नुसती चाखवली नाही तर त्याच्या प्रेमात पडायला भाग पाडलं.

अर्थातच आपल्या जेवणाची ताकद ओळखून तेवढ्याच ताकतीने ते खवय्यांपर्यंत पोहोचवणं यामागे ३ दशकांचं संशोधन, मेहनत, विचार, जिद्द आणि त्याग सर्व काही आहे. चैतन्यची अन्नपूर्णा सुरेखा वाळके यांचा आपल्या जेवणाचा तगडा अभ्यास - पाण्याची चव, मिठाचा पोत, नारळाचा दर्जा, मसाल्याचा दर्जा, त्याचं प्रमाण, तापमान, त्याच बरोबर मालवणी पाककृतींमध्ये ऋतू व ठिकाण परत्वे होणारा बदल यांचा अभ्यास, कच्च्या मालाची पुरवठा साखळी आणि सोबतीला नितीन वाळके यांची दूरदृष्टी, विपणन कला, सोबत २०० हुन अधिक सेवा पुरविणारे हात आणि ज्याची गणतीच नाही असे चवीने खाणारे खवय्ये हे चैतन्यचे आधारस्तंभ आहेत.

मालवण ते मुंबई असा प्रवास करत घरगुती जेवणाला अस्सल मालवणी ते Authentic Malvani Cuisine अशी ओळख निर्माण करण्यापर्यंतची मजल चैतन्य ने मारली आहे. आज यात अजून एक नाविन्यपूर्ण गोष्टीची भर पडत आहे. चैतन्यला बोलावणे आले आहे थेट चेन्नईच्या 'रेन ट्री' हॉटेल कडून, त्यांच्या येथील खवय्यांना अस्सल मालवणी चव चाखविण्यासाठी. २५ जुन ते ३० जून या दिवसात एक मालवणी खाद्य महोत्सव - The Taste of Malvan या नावाने रेन ट्री या तारांकित हॉटेल ने आयोजित केला आहे. हा अनुभव 'द सोल ऑन द प्लेट'च्या योगिता उचित यांनी जुळवून आणला आहे. ५ दिवसांच्या या POP-up पद्धतीच्या कार्यक्रमात सेट मेनू म्हणजेच थाळी व बुफे अश्या दोन्ही तऱ्हेने चेन्नईचे खाद्य रसिक मालवणी जेवणाचा आस्वाद घेतील. मालवणी मसाल्यातील बटाटे वडे ते ओल्या काजूची उसळ, कुळथाची पिठी ते माश्याच तिखलं, आमटी, भाजलेले मासे, भरलेले पापलेट, कोळंबी भात ते चिकन सागोती, वडे, भाकरी आणि मालवणी जेवणाची भैरवी सोलकढी अशी रेलचेल असेल. असं हे दुसऱ्या राज्यातुन बोलावणं येणं हा चैतन्यचा सन्मान जरूर आहे, पण त्याहूनही मोठा तो आमच्या जेवणाचा सन्मान आहे. असे चैतन्याच्या सर्वेसर्वा सुरेखा वाळके सांगतात.

# वाचक पत्र

### वटपौर्णिमा आणि पर्यावरण रक्षण

वटपौर्णिमा हा हिंदू धर्मातील एक महत्वाचा सण आहे. आपल्या सौभाग्याच्या रक्षणार्थ या दिवशी महिला वटवृक्षाचे पूजन करतात. अनेक वसाहतींमध्ये, चाळींमध्ये, गावांमध्ये महिला आपल्या लहानग्यांसह एकत्रिपणे हा सण साजरा करतात. प्रतिवर्षी या दिवसांत पावसाने निसर्ग बहरून आलेला असतो आणि अशा नयनरम्य वातावरणात सगळ्यांनी एकत्रपणे उपवास करून वटवृक्षाची केलेली भावपूर्ण आराधना जगाला खूप महत्वाचा संदेश देऊन जाते. वटवृक्षाभोवती प्रदक्षिणा घालताना त्याच्याकडून पुष्कळ प्रमाणात प्रक्षेपित होणाऱ्या प्राणवायूचे ग्रहण करणे आणि या दिवशी उपवास करून सात्विक फराळाचे सेवन करणे या बाबी आपल्याला पावसाळ्यात आरोग्य कसे जपावे हे सांगतात. उन्हाळ्यातील उकाड्यामुळे शरीराला आलेला थकवा या वेळच्या प्रसन्न वातावरणामुळे आणि भोवतालच्या स्त्रियांशी होणाऱ्या स्नेहमिलनामुळे कुठल्या कुठे निघून जातो. एकीकडे पाश्चात्य संस्कृतीचा प्रभावामुळे आधुनिक युगातील पती-पत्नींमधील वाद, भांडणे, विवाहबाह्य संबंध, घटस्फोट यासारख्या गोष्टी अवतीभोवती पाहायला मिळतात तर दुसरीकडे आपली प्राचीन हिंदू संस्कृती वटपौर्णिमेसारख्या सणांच्या माध्यमातून पती-पत्नींना एकमेकांप्रती समर्पणाची भावना जपायला शिकवते. आपल्या जोडीदाराशी एकनिष्ठ राहण्याची शिकवण देणारा हा सण सध्याच्या काळात कुटुंबव्यवस्था आणि पर्यायाने समाजव्यवस्था उत्तम ठेवण्याचे महत्कार्य करतो. हल्ली बहुतांश वसाहतींमध्ये वटपौर्णिमेला वडपूजन करणे सोयीचे व्हावे यासाठी एक तरी वडाचे झाड लावले जाते. यानिमित्ताने पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वृक्ष लागवडीचे आणि संगोपनाचे महत्व प्रतिबिंबित केले जाते. आपल्या भारतीय संस्कृतीचा हा समृद्ध वारसा सुज्ञपणे जपला आणि येणाऱ्या पिढीवरही तो प्रभावीपणे बिंबवला तर जागतिक तापमान वाढ, विस्कळीत होत चाललेली समाज व्यवस्था आणि अनारोग्य यांसारख्या समस्या सहजच सुटतील.

सौ स्वाती हरेर

## आठवणींच्या गोष्टी

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# अजरामर स्वरसम्राट, भक्तीगीतांचा बादशहा प्रल्हाद शिंदे

सन 1989साल असावं माझ्या सोबत काम करणारे लोखंडे यांचा मुलगा धावत दवाखान्यात आला. दादा तुला पप्पांनी घरी बोलावलं आहे. आमच्याकडे गायक प्रल्हाद शिंदे आलेत. व्हीटी येथे जी.पी.ओ.त नोकरी करून संध्याकाळी आमच्या दवाखान्यात पार्टटाईम नोकरी करणाऱ्या लोखंडेच्या घरी प्रल्हाद शिंदे कशाला येतील. अशी मनात शंका आली. डॉक्टरांना विचारलं जावून येऊ का ? डॉक्टर खूप चांगले. सद्गृहस्थ होते. माझ्या गाण्यांच वेड त्यांना माहित होत. गर्दी कमीच होती. मला म्हणाले,' तू जा. लवकर ये'.

मी लोखंडे यांच्या घरी गेलो. प्रल्हाद शिंदे त्यांच्याशी गप्पा मारत होते. मी जाताच ,दादा हा आमचा सावंत कोकणातला चिपळूणचा आहे, याचं नावं राष्ट्रपाल, गाणी छान गातो , लिहितोही, तुमचा नी आनंद मिलिंदचा चाहता आहे. लोखंडेनी एका दमात सारं सांगितलं. ते शांतपणे ऐकत होते. मी शिंदेना नमस्कार केला. एवढा मोठा कलावंत आपल्या समोर बसलेला आहे. ज्यांची गाणी आपणं रेडिओ, लाऊडस्पिकर, कॅसेट ला ऐकतो ते हेचं का? कारण त्याआधी मी त्यांना समक्ष पाहिलेलं ऐकलेलं नव्हतं. लोखंडे म्हणाले,' दादांना तुझ गाणं म्हणून दाखव. हिमालया पुढे छोट्या टेकडीने उभ राहावं असा तो प्रकार, मी भीतीपोटी नाही म्हणालो.' पणं स्वतः या स्वरसम्राटाने म्हण गाणं सांगितलं मी दोन स्वरचित गाणी ऐकवली. 'अरे व्वा! आवाज आणि गाण्याचा विषय छान आहे. आनंदला भेट एकदा .लोखंडे उभयतां, त्यांची मुलंश्रोते होते. प्रल्हादजी शिंदेची नी माझी अशी पहिलीच भेट. पणं ती अविस्मरणीय मला प्रेरणा प्रोत्साहन देणारी ठरली, गातोस, लिहितोस , नोकरी करून शिकतो आहेस, चांगलं शिक्षणं घे नोकरी कर , कलाछंदही जप मोठा हो म्हणाले .आभाळा एवढया उंचीच्या नी कीर्तीच्या कलावंताचा सल्ला आयुष्यात उपयोगी पडला. आणि तो स्मरणात राहिला आहे.

आज 23जून प्रल्हाद शिंदे यांचा स्मृतीदिन .काहीं माणसं आपल्या स्मृती आपल्या कर्तृत्वाने कायमच्या ठेवून जातात. या विश्वात जोवर सूर्यचंद्र तारे आहेत तोवर प्रल्हाद शिंदे यांचा स्वर या विश्वात घुमत राहिलं. कलावंताना भेटणं त्यांच्याशी गप्पा मारण,त्यांच्या विषयी त्यांच्या वा दुसऱ्या कडून जाणून घेणं हा माझा छंद. कारण यातूनच आपल्याला दिशा ,मार्गदर्शन मिळतं असते. आपली प्रगती होत असते. असंख्य भक्ती, भावगीते, लोकगीते गाणाऱ्या प्रल्हाद शिंदेच्या गाण्या विषयी मीच काय अन्य कुणीही यापुढेही कौतुकचं करणारं. तो ताल स्वर वेगळाच होता असे व्यक्तिमत्व होणे नाही. प्रल्हाद भगवान शिंदे हे पूर्ण नावं, आई सोनाबाई, भाऊ आई वडील कलावंत, आईं उत्तम तबला वादक नी गायक होती. गाण्याचं नी तालाच बालकडू घरीच मिळाल.

शंभर वर्षांपूर्वीची काय परिस्थिती होती याची कल्पना नव्या पिढीला नसेल, सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढ्यातून मजलदरमजल करत मुंबई शहराची वाट धरली कारण हे शहर कलेची कदर करणारं पोटीची भूक भागवू शकेल ही समज आजही सर्वांची आहे. त्याकाळातही होती. अंगात कला असल्याने तबला पेटी वाजवत भक्तीगीत गात गल्ली बोळातून फिरत, कधी फूटपाथ तर कधी रेल्वे स्टेशनला गाणी गात, तेव्हाचा पै पैसा संसाराला उपयोगी पडत होता. मुंबईत दगडीचाळ, शिवडी, अशा वेगवेगळया ठिकाणी राहून मुंबईत गाणं गात फिरत राहीले. छोटा प्रल्हाद आईवडिलांचं गाणं, वादन लक्षपूर्वक पाहत, ऐकत होतें. ते उत्तम तबला वाजवून गाण्याचे स्वरही आळवू लागले, आईवडिलांसह इतरांनाही त्यांचं कौतुक वाटू लागलं. त्याकाळातील इस्माईल आझाद यांचे सह बड्याबड्या कव्वाली गायकांना त्यांनीं तबला नी उत्तम कोरस साथही दिली. कुठलंही शास्त्रीय संगीत न शिकलेले आई वडीलान शिवाय कुणी गुरू नसताना प्रल्हादजींच्या स्वरांनी महाराष्ट्रात घराघरात, नी देशात नावलोकिक मिळविला. ही आजच्या कलावंतासाठी प्रेरणा देणारी गोष्ट आहे.त्यांच्या यशाचं खरं गमक त्यांची कलेवरची निष्ठा, त्यासाठी केलेली वणवण, सोसलेल्या त्रास, कधी अपमानही सहन करावे लागले, सादर केलेल्या कार्यक्रमाचे पुरेश मानधनही मिळाले नाही पणं नाराज न होता जिद्द चिकाटीने ते गात, फिरत होते. मोठ्या बंधूंची साथ प्रोत्साहन आणि आई वडिलांचे आशिर्वाद त्यांच्या सोबत होते. साधं सरळ निर्गर्वी, दिलदार असं व्यक्तिमत्व म्हणून ते सर्वांचे कलाक्षेत्रात "दादा "ठरले.मानापानासाठी ते कुणाच्या मागे फिरले नाहीत.स्वाभिमानाने जगले. आपल्या कुटुंबाचा,मुलांचा योग्य सांभाळ केला, त्यांना कलेचा वारसा दिला त्यातूनच आज महाराष्ट्राच्या कलाक्षेत्रात "शिंदेशाही"ची त्यांच्या आईं वडिलांसह प्रल्हाद ते आल्हाद ही पाचवी पिढी गात आहे.

पंढरीच्या पांडुरंगाची असंख्य गीते, अभंग त्यांनी गायले आहेत. ती गीते ऐकून वारकरी आनंदी होतात."चल ग सखे पंढरीला, पाऊल चालती पंढरीची वाट ही गीते मला खुपचं भावतात.
"ऐका सत्यनारायणाची कथा"हे गीत ऐकल्या शिवाय पूजा घालणाऱ्याला समाधान मिळतं नाही.

**"तूच सुखकर्ता, तूच दुःखहर्ता**
**अवघ्या दिनांच्या नाथा**
**बाप्पा मोरया रे**
**या गिताशिवाय गणपती उत्सवात मजा येत नाही.**
**"हळूहळू हलवा ग**
**सोनुल्याचा पाळणा**
**त्यात चिमुकला माझा छकुला**
**दिसतो कसा देखणा "**

(पान ९ वर )

## बापाचं काळीज

प्रा.के. एस. शिरबंदे,
दापोली.



**बाबुल की दुवाएं लेती जा,**
**जा तुझको सुखी संसार मिले..!**
**मैंकेकी कभी न याद आये,**
**ससुराल मे इतना प्यार मिले..!**
**बाबुल की दुवाएं लेती जा,**
**जा तुझको सुखी संसार मिले..!!**

"नीलकमल" या 1968 सालच्या सिनेमातलं हे दर्द भरे गाण मोहम्मद रफीने, लग्नानंतर सासरी जाणाऱ्या लेकीसाठी, बाबांनी गायलेलं काळीज पिळवटून टाकणार, हे अजरामर गाणं आहे...! हे गाणं माझ्या काळजात लहानपणा पासूनच कुठेतरी खूप खोलवर घट्ट रुतलेलं आहे..!

त्याच असं झालं की, आम्ही लहानपणी सहावी सातवीला असताना शाळेची स्टेशनरी आणण्यासाठी, गुरुजी आम्हाला मिरजेला पाठवायचे..! स्टेशनरी खरेदी झाल्यावर छान पैकी पिक्चर बघायचा आणि मग परत पायी पायी आम्ही आमच्या गावी जायचो..! एके दिवशी मिरजेला आलो असताना,असे झाले की, आम्हाला फायटिंग असलेला दारासिंगचा "फौलाद" पिक्चर बघायचा होता, पण तो आदल्या दिवशीच गेला होता, व त्या ठिकाणी "नीलकमल" पिक्चर लागला होता..! आता काय करायचे ? मग सर्वांनी ठरवलं की, आता नीलकमल पहायचा..! कुठला पिक्चर आहे यापेक्षा, मस्तपैकी कुशनच्या खुर्चीवर पंख्याखाली बसायला मिळतं, थंडगार हवा खायला मिळते, एरवी गावाकडे आम्हाला तंबूतल्या मातीत बसावे लागत असे व आता हे खुर्चीवर बसण्याचे दुर्मिळ सुख घ्यायचं म्हणून, आम्ही मग सर्वांनी सेकंड क्लासचे एक रुपया पंचवीस पैशाचे तिकीट काढून आम्ही स्थानापन्न झालो..!

थोड्याच वेळात पडद्यावरच्या ब्रू कॉफीची, कोलगेटची, लक्स साबणाच्या जाहिराती संपून, नीलकमल नावाच पिक्चरच मोठं टायटल पडद्यावर झळकतं, नट नट्यांची नावे झळकतात, व पिक्चरला सुरुवात होते..! पुनर्जन्मावर आधारित असं पिक्चरचं कथानक आहे..! एका आत्म्याचा दुसऱ्या आत्म्याशी संवाद होतो..! पुढे वहिदा रहेमान या लेकीचं लग्न होतं व तिचा बाप बलराज सहानी व घरचे सारे, लेकीला निरोप देण्यासाठी स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर येतात व त्या ठिकाणी वरील गाणे, रफीच्या दर्दभऱ्या आवाजात सुरू होते..! सारे थिएटर एकदम शांत, शांत व सुन्न होते..! थिएटर मध्ये हळूहळू आजूबाजूचे प्रेक्षक हुंदके देऊन रडू लागतात...! रडण्याचा आवाज साऱ्या थिएटर मध्ये घूम लागतो...! आम्ही सारे त्यांच्याकडे अवाक होऊन पाहू लागतो..! आम्हालाही त्यांच्याकडे पाहून रडायला येऊ लागलं..! त्या प्रसंगाची तीव्रता व दुःख त्यावेळी आमच्या लक्षात येत नव्हती..!

पण आता, आम्ही मोठे झालो ,बाप झालो, लेकीची बिदाई काय असते, त्याचं दुःख काय असतं, हे आता खऱ्या अर्थाने समजू लागलं...! बापाने लहानपणापासूनच लेकीला तळहाताच्या फोडा प्रमाणे जपलेली असते आणि जेंव्हा ती सासरी जाऊ लागते
तेव्हा त्याच्या काळजाचा तुकडा कुणीतरी चोरून नेत असल्याचा त्याला भास होतो..! व मग या खंबीर बापाच्या दुःखाचा बांध फुटतो व लेकीला छातीशी कवटाळून तो. ओक्सबोक्षी रडू लागतो...!

हे गाणे ऐकत असताना मला माझ्या बाबांची आठवण आली..! बाबाही माझी बहीण कमल हिच्या लग्नात, तिला निरोप देताना धाय मोकलून रडला होता..! त्याचा मी साक्षीदार आहे..!

आता माझ्या बाबांची कहाणी ऐका..! माझे बाबा शेतमजूर होते, पानमळ्यात दिवसभर वेल बांधायला जायचे..! माझी आईही शेतीतली इतर कामे करून संसाराला हातभार लावायची..! घरात गरिबी होती पण मनाची श्रीमंती होती...!

आम्ही चार भावंडे होतो, आमचे बाबा सर्वांना खूप जीव लावायचे, माया करायचे, शुक्रवारच्या आठवड्या बाजारातून, आमच्यासाठी चिरमुरे व खारी व गुळाची शेव घेऊन यायचे...! आम्ही सारी भावंडे एकत्र बसून त्यावर ताव मारायचो...!

माझी शाळा माळावरची होती, थोडी लांब होती, पावसा पाण्यात रस्त्यावर चिखल व्हायचा, माझे बाबा मग मला खांद्यावर बसवून शाळेत पोहोचवायचे..! व शाळेत आल्यावर गुरुजींना सांगायचे, माझा पोरगा हुशार आहे, त्याच्याकडे लक्ष द्या..! गुरुजी बाबांना म्हणायचे , "सखा मामा तुम्ही काळजी करू नका" तो हिरा आहे, तो कुठेही पडला तरी चमकणारच..! बाबांचे डोळे आनंदाने चमकायचे..! ही बातमी आई पर्यंत यायची व आईलाही आनंद व्हायचा...!

मला दृष्ट लागू नये म्हणून आई दररोज संध्याकाळी माझ्यावरून मीठ मिरच्या ओवाळून टाकायची...! बाबा ते पाहून मनस्वी खुश व्हायचे...! मी शाळेत एक नंबर ने पास झालो की, बाबा मला वेशीतल्या मार्तंडाच्या हॉटेलातून मोठा पेढा घेऊन भरवायचे...! व घरी देखील खाण्यासाठी पावशेर पेढे व भडंगाचा मोठा पुडा बांधून घ्यायचे..! संध्याकाळी पुन्हा आम्ही सर्व भावंडे मिळून त्याच्यावर ताव मारायचो..! व मी पास झाल्याबद्दलचे अशा पद्धतीने सेलिब्रेशन व्हायचे...!

आम्ही घरातली कोणी भावंडे किंवा आई तापाने फणफणले की, बाबा लगेच डोक्याला फेटा बांधून , गावातला एकमेव देव माणूस डॉक्टर फडतरेना बोलवून आणून आमच्यावर उपचार करायचे..! आमचे बाबा कधी आजारी पडल्याचे मी पाहिलं नाही..! कदाचित देवानेच आमची काळजी घेण्यासाठी त्यांना स्ट्राँग बनवलं असणार, अशी माझी धारणा आहे..!

**"आपलं दुःख मनात ठेवून,**
**दुसऱ्यांना सुखी ठेवणारा"**
**एकमेव देव माणूस..**
**म्हणजे बाप...!**

(पान ९ वर )

# काव्यांगण

## आधुनिक सावित्री....

आधुनिक सावित्री नाही लेचीपेची
आहे ती सुज्ञ आणि बरीच हिम्मतीची
आहे सर्वगुणसंपन्न प्रतिमा तिची
मूर्तीचं जणू ती आदिशक्तीची
आहे विवेकी नि सुविचाराची
जणू नित्य सबला धारिष्ट्याची!!१!!

काय वर्णू मी थोरवी तिची
ती सावित्री सत्यवानाची
करता भ्रमंती मी विश्वाची
भासे माऊली ती जगताची
ख्याती अहिल्येची शूरतेची
शिकवण जिजाऊ वाघिणीची!!२!!

निडरता राणी लक्ष्मीबाईची
तशीच मीरा नि किरण बेदीची
अंतरीक्ष मक्तेदारी कल्पनाची
ख्याती सेवाभावी मदर तेरेसची
विज्ञानात सरशी मादाम क्युरीची
अपंगत्वावर मात हेलन केलरची!!३!!

विश्वभूमी सजली या स्त्रियांची
पूंजी ध्येय पराक्रम चिकाटीची
गाठली उंची त्यांनी क्षितीजाची
नाही क्षती भय दारुण पराभवाची
आहे लालसा ज्ञान प्रगतीची
आवड आहे विश्व विख्याततेची!!४!!

**सुखदा सयाजीराव गोरड**

## वटपौर्णिमा

इथे तिथे, तिथे इथे किती पळापळ केली
पार्लर ची अपॉंटमेंट थोडक्यात हुकली

शोधा पॅक, नथणी, आंबाडा, साडी नऊवार
मॅचिंग काही मिळेच ना किती उसनवारी

ऑर्डर दिली फळांची करंडी येईल घरी
नैवेद्याची थाळी सजवून द्या ना कुणीतरी

तुझ्यासाठी करते ना वटपौर्णिमेचा सण
माझ्यासाठी करते सारे मनात तरी म्हण

कशी दिसते सांग रे आणि फोटो काढ छान
टेटसला फोटो ठेवीन तुला देतांना वाण

दुपार झाली हे फोटो कुठे कुठे पाठवले
जेवण मागव, मी लाईक बघून दमले

**चारुशीला देऊलकर**

## माझी वटपौर्णिमा

मीही सावित्री आहे, पण आधुनिक युगाची
मी ठेवत नाही व्रत वा उपवास आजच्या दिवसासाठी त्यापेक्षा
तुझ्या आरोग्याची काळजी घेण्याची
तजवीज मी जरुर करते
मी घेत नाही सुट्टी आजच्या पुजेसाठी
सकाळीच श्रद्धेने मनोभावे देवाला नमस्कार करून
मी दिवसभरातली माझी कर्तव्य पार पाडते जबाबदारीने
मी आणत नाही तोडून वा विकत वडाची फांदी पुजण्यासाठी
त्याऐवजी मी सदैव प्राणवायू देणारी रोपे लावून
त्यांची निगुतीने करते जोपासना
मी प्लॅस्टिकच्या द्रोणांतून वाटत नाही
दोन-चार फळं वा सुकामेवा पण
आजच्या दिवसाचं निमित्त साधत
मी भुकेलेल्याला अन्नदानाचा वसा मात्र जपते
मी गुंडाळत नाही वडाभोवती धागा फेऱ्या मारत
त्यापेक्षा असलेला प्रत्येक क्षण तुझ्यासोबत
समरसून जगणं मला जास्त भावतं
मी सात जन्मासाठी तुला मागत नाही देवाकडे
याच जन्मात तू सुखी समाधानी राहशील माझ्यासोबत
याचा प्रयत्न मी जरूर करते
तुला चुकीच्या मार्गावरुन मी तुझी मैत्रिण होत खेचून आणते नि
योग्य मार्गावर चालताना जोडीदार होत तुला साथ देते
तुझ्या केवळ सुखातच नव्हे तर दु:खातही सोबतच राहते
संकटाशी तुझ्याही आधी झुंजण्याची जिद्द बाळगते
शेवटी वटपौर्णिमेचा खरा अन्वयार्थ कोणता?
तर मी तुझ्यासोबत नि तू माझ्यासोबत कायम खंबीरपणे असणं
आपलं एकमेकांसोबत आयुष्यभर असणं
नात्यांची खोलवर रुजलेली मुळे, मायेच्या पसरलेल्या पारंब्या
विश्वासाचा भारदार बुंधा नि चिरंतन काळ आपलं अस्तित्व रोवून
ठामपणे उन्हापावसात घट्ट उभ्या वडासारखच.

**प्रा. सौ. मृण्मयी सचिन पोकळे,**
**सावंतवाडी**

## अशीही सावित्री

कालच ठरवल्याप्रमाणे ती
आज योडी लवकरच उठली.
रोजची कामे आटपून
थोडी नटून तयार झाली.
तबकं सजवली
वाणं तयार झाली
लगबगीने पुजेसाठी
वडाच्या झाडापाशी आली.
बायकांच्या घोळक्यात
मिसळून गेली.
मनापासून पूजा केली
मागणं मागताना
थोडी धास्तावली.
मागणं मागावं कसं
सात जन्म हाच पती?
या जन्मी सोसते ते
सात जन्म सोसू कशी?
तरीपण देवा त्याला
मनापासून साथ दिली
चुका पदरात घेऊन
भरभरून माया केली.
सात जन्म मागते त्याला
बदलू दे त्याची वृत्ती
व्यसनं त्याची सुटू देत
मग होऊ आम्ही सुखी.
संवाद साधत देवाशी
पूजा तिने केली.
भिस्त सारी त्यावर सोडून
कामावरती गेली.
धुणी भांडी लादी पुसणे
सारी कामे झाली.
नेहमीप्रमाणे घरी ती
संध्याकाळीच आली.
उंबरठ्यावर पाय ठेवताच
शिवी पडली कानी
दारू पिऊन भेलकांडत
स्वारी बाहेर आली.
अशा एका सावित्रीची
वटपौर्णिमा ही अशी
कष्टाची तिच्या जाण ठेवून
सुधारेल का तिचा पती?

**प्राजक्ता आपटे,**
**वेंगुर्ला भटवाडी**



## अजरामर स्वरसम्राट, भक्तीगीतांचा बादशहा प्रल्हाद शिंदे

**(पान ८ वरून )**

बारशात हे गीत हमखास ऐकायला मिळते.
शुभ मंगल सावधानसह त्यांनीं गायलेल्या अन्य लग्नगीता शिवाय लग्न मंडपात मजा येत नाहीं.

**"जरी संकटाची काळ रात्र होती**
**तरी भिमराया तुझी साथ होती"**

अश्या त्यांच्या असंख्य भीमबुध्दगीत जयंतीत स्फूर्ती प्रेरणा देतात उत्साह वाढवितात. त्यांनी गायलेली लोकगीतंही श्रमिक, सोशिक, गरीब श्रीमंताना आनंद देतात

**"तुझा खर्च लागला वाढू**
**सांग किती ग कर्ज काढू"**

अशी असंख्य लोकगीतं आणि गेला हरी कुण्या गावा, रुतला पायी काटा या गवळणी श्रवणीय आहेत.
**"गेला हरी कुण्या गावा"** आणि
**"उड जायेगा एक दिन पंची रहेगा पिंजरा खाली "**
साहेबराव कोकाटे यांनी लिहिलेलं गीत नेहमी गात गायलेल

**"घडे सर्व काहीं या पैश्याच्या पाही**
**पैश्याच्या पाही भाऊ भावाला खाई"**

अशी किती गीत सांगावीत. डोक्यात हवा न गेलेला, जमिनीवर पाय असणारा. अंधेरी स्टेशनात आपला जुना तबला वादक लोखंडेचा भाऊ भेटताच, ये भावा म्हणून हाक मारणारा, त्यांनी दादा चला माझ्या घरी म्हणताच त्याच्या सोबत ३३३ नंबर बसने घरी येणारा, त्यांच्या मुला-लेकरात चटईवर बसून गप्पा मारणारा, त्यांच्या घरी अचानक आलेल्या पाहुण्याला आपुलकीने ताटात वाढलेलं खाणारा कलावंत आज दुर्मिळ झाला आहे. मी शिक्षक झाल्यावर ऑक्टोबर १९९४ ला रत्नागिरी गुहागर तालुक्यात शृंगारतळी येथे नवरात्र उत्सवात त्यांचा कार्यक्रम ऐकायला गेलो. भेटलो आपणं लोखंडेच्या घरी भेटलो होतो आठवण सांगितल. मी आता गावी शिक्षक झालोय इथून जवळचं गावं आहे सांगितलं. वा छान, मुंबईत आलात तर या कल्याणला, मुंबईत माझ जाणं येणं असतं पण सतत भ्रमंतीत असणाऱ्या या महान व्यक्तीची भेट झाली नाही . २३ जून २००४ला आपला स्वर अजरामर ठेवून त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

## बापाचं काळीज

**(पान ८ वरून )**

आता "माझा बाप" आयुष्याच्या संध्याकाळी खूप थकलेला होता, त्यांना दम्याचा त्रास सुरू झाला होता..! श्वास घ्यायला त्यांना कठीण जात होते...! एके दिवशी रात्री त्यांना खूप ताप भरला..! फडतरे डॉक्टरांना बोलवून आणले..! त्यानी दोन इंजेक्शन दिली..! पण काही उपयोग झाला नाही..! घशातली घरघर वाढली..! डॉक्टर म्हणाले, आता देवच तुमच्या बाबांना वाचवू शकतील...! आम्ही सर्वांनी त्यांचा हात हातात घेऊन, त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करत होतो..!
बाबा आपल्या खोल गेलेल्या डोळ्यांनीच आमच्याशी बोलण्याचा , काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करीत होते..! पण आम्हाला काही समजत नव्हते...! पण आम्ही त्यांचे अंतर्मन ओळखून होतो, ते म्हणत असणार...! माझ्या काळजाच्या तुकड्यांनो...! तुम्ही भांडू नका.! एकमेकांना मदत करा ! गुण्या गोविंदाने रहा..! सुखी रहा..! तुमच्या आईची काळजी घ्या ! तिला जपा..! तुम्हाला मोठे करण्यामध्ये माझ्या इतकाच तिचा देखील मोठा वाटा आहे..! चला ! आता माझी अनंताकडे जाण्याची वेळ झाली...! तुम्हा सर्वांना माझा अखेरचा दंडवत ..! अखेरचा दंडवत..! असे म्हणत, म्हणत, त्यानी आपले डोळे फिरवले व अखेरचा श्वास घेतला..!
बाबा,बाबा म्हणून आम्ही साऱ्यांनी त्यांना अखेरची मिठी मारली..! आयुष्यभर ज्यांनी आम्हाला मिठीत घेऊन मोठं केलं..! आज त्यांनाच आम्ही मिठीत घेतलं...! आज त्यांनाच आम्ही मिठीत घेतलं...!!

बाप म्हणजे अपरिमित काळजी करणारं मन....!
स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून, मुलांसाठी झटणार अंतःकरण..! अशा या बापास माझे कोटी,कोटी नमन..!!

## प्रथम सरी

ग्रीष्मात त्रास तप्त उन्हाचा
"त्राही माम्" आक्रोश प्राणीमात्रांचा
अंत करी पाऊस पहिलावहिला
निसर्गाने जो भूमी चरणी वाहिला
धरित्री पहा कशी सुखावली
आनंदित अन् पल्लवित झाली
कोंब अपत्ये त्या माती काळीचे
बनती हरित मखमली गालिचे
फुलेफळे हळदकुंकू तिच्या भाळीचे
जल निर्झर ओढे नद्या नालीचे
अश्रू पर्वतांच्या गालीचे
क्षारयुक्त डाग त्यांच्या चालीचे
"जीवन"दान त्या वनमालीचे
अर्पण कृपाळुस नैवेद्य थाळीचे

**डॉ. प्रेमा मेणशी,**
**बेळगावी-कर्नाटक**





## बापाचं काळीज

**डॉ. प्रेमा मेणशी, बेळगावी कर्नाटक**

माझे दादा सुशिक्षित मध्यमवर्गीय नोकरीदार माणूस.त्यामुळे आमच्या कुटुंबानं कधीच गरिबी बघितली नाही. पण मध्यमवर्गीय कुटुंबप्रमुखाच्या वाट्याला येणारं नियोजन, काटकसर, थोड्यात गोडी मानूनही भावी काळाचा स्पष्ट नकाशा डोळयासमोर ठेवून लवचिकतेने त्याला धक्का न लागेल अशा रितीनं जीवनयापन कसं करायचं याचं प्रात्यक्षिकच होते, आई आणि दादा.आणि त्यांनी संस्कारांसोबत ही चतुरतेची जी शिदोरी आम्हांला आमच्या भावी आयुष्यासाठी दिली होती, ती आजवरही आमच्यासंग आहे.

आमचे बाबा ना मायाळू, उदारवादी, शिस्तीचे पाईक, कमी बोलणारे, संवेदनशील असे काहीसे एकामेवाद्वितीय व्यक्तिमत्त्वाचे धनी होते. प्रत्येक वर्षी वार्षिक परीक्षेआधी आम्हां बहिण भावंडांना समोर बसवून एक उद्घोषणा करायचे, कि जितक्या विषयात वर्गातील इतर विद्यार्थ्यांपेक्षा अधिक अंकानं उत्तीर्ण होऊ तितकी पारितोषिकं आणि वर्गात प्रथम वा द्वितीय क्रमांकानं पास झाल्यास विशेष बहुमान आम्हास मिळणार.

बक्षीसं शालोपयोगी वस्तुंच्या स्वरूपात असायची. निकालानंतर ताबडतोब त्या वस्तू आमच्यापर्यंत पोहोचायच्या. शपथीनं सांगते कि ती सारी पारितोषिकं मिळून विविध प्रकारच्या शालेय वस्तुंचा एक जमावडा व्हायचा, ज्याला आजच्या भाषेत हॅम्पर म्हणतात ना, तसला आणि या गोष्टीचा आम्हां भावंडांना खूप आनंद व अभिमान वाटायचा. दहावीच्या परिक्षेआधी त्यांनी माझ्यापुढे बंपर पारितोषिकाचं आमिष ठेवलं होतं. वर्गात प्रथम आले तर मनगटावर बांधायचं घड्याळ आणि माझी लॉटरी लागली. जय्यत तयारीमुळे नव्हे तर योगायोगाने मी प्रथम क्रमांकानं उत्तीर्ण झाले.

उन्हाळ्याची सुट्टी आजोळी घालवून मे महिन्याच्या अखेरीस घरात पाऊल टाकायच्या वेळी माझं Favre Leuba घड्याळ माझ्या स्वागतासाठी तयार होतं.
अशा रितीनं दादांनी मला माझं मनागटावरील घड्याळ कमवायला भाग पाडलं, याचा मला सार्थ अभिमान आहे. असे बाप आजकाल विरळा झालेत कि काय ? मला ही शंका नित्य सतावते.

**जगावेगळे विशिष्ट माझे बाबा |**
**हरेक बाबांसारखे च माझेही बाबा ||**
**तुम्हालाही असंच वाटतं ना?**



## बाबा एक देव माणूस....

तसं पाहिलं तर प्रत्येकालाच आपले वडील देव माणूसच आहेत. सर्व जण जून महिन्यात तिसरा रविवार आला की प्रेम ओतू जातं. नाहीतर काही मुलं विचारतही नाहीत. आणि ही माणसं गेल्यावर मोठं प्रेम उफाळून येतं. जाऊदे ज्याचा त्याचा प्रश्न आहे.
आम्ही मात्र पहिल्या पासून मोठ्यांचा आदर ठेवणं. मानाने त्यांच्याशी बोलणं . बाहेर पडताना नमस्कार करून आशीर्वाद घेऊनच जाणं. हे लहानपणापासून अंगात भिनलेलं होतं.
मला आठवतंय आता शाळेत नाव घालायचं ठरवलं गेलं. दुसऱ्या दिवशी बाबा , मी एक छोटीशी पिशवी. त्यात जन्म दाखला आदि कागदपत्रं. अशी स्वारी शाळेत ऑफिस मध्ये दाखल झाली. गुरुजींनी स्वागत केलं. नाव विचारलं. मी सांगितलं. नाव तुझं घालून झालं. 10 जून ला शाळेत यायचं. म्हटल्यावर जो एक आनंद झाला ना. तो अविस्मरणीय होता.

दुसऱ्या दिवशी आजोबांनी एक पाटी, पेन्सिलचा खोका खरेदी करून घरी येऊन मला दिला. तेव्हाही खूप खुश झाले होते मी. कारण हे माझं स्वताचं आहे ते आपणच व्यवस्थित ठेवायचं, जागच्या जागी. हे ठेवायला छोटंसं दप्तरही होतं. बरं का. बाबांनी एकदाच सुरूवातीला दाखवलं होतं दप्तर कसं भरायचं. जाग्यावर कुठे ठेवायचं. वगैरे. आमच्या घरात एक सर्वांनाच शिस्त होती. सर्व गोष्टी वेळेत नि जागच्या जागी असल्याच पाहिजेत. चुकून कधीतरी आमचं राहिलं तर बाबा नबोलता ते ठेवून मोकळे होतं. पण कधीही रागावलेले नाहीत. त्यांना एक माहित की आपण नि आपलं काम.

शाळेचा दिवस उजाडला. सकाळी सर्व आईने माझं आवरुन वेणी घालून, नवा फ्रॉक घालून तयार केलं. बाबांना, आजीआजोबा, आई, देवांना नमस्कार करून आमची स्वारी निघाली. बाबांनी शाळेत नेउन पोहोचवलं. ते घरी आले. आपल्या कामाला सुरुवात झाली. घराजवळच शाळा असल्याने तशी काळजी नव्हती. शाळा भरली, प्रार्थना झाली, सगळं व्यवस्थित पार पडलं. नंतर शाळा सुटली. वाडीतील मुलांबरोबर मी घरी आले. बाबा नि सर्व मोठ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद होता. बाबा खूपच खुश होते. चौकशी केलनी. काय कशी झाली शाळा वगैरे.

दुसऱ्या दिवशीपासून आमचं रुटीन चालू झालं. हे सर्व व्यवस्थित होत आहे. याचही बाबांना खूप आनंद झाला होता. अजूनही बाबा म्हणतात केव्हा तरी ते तुमचे शाळेचे दिवस, ती मज्जा आत्ताच्या मुलांत नाही दिसत. हे सर्व जग वेगळच झालय. आमचे बाबा आम्हाला खरंच एक देव माणूस आहेत. शिस्तीला चुकून बोलले असलेतर नाही तर आम्ही मुलांनी कधीच ओरडा, मार खाल्ला नाही. त्यांच्यामुळे आम्ही सर्व भावंडं व्यवस्थित शिकलो, चांगलं आयुष्य जगत आहोत. बांबांचे, मोठ्यांचे संस्कार आम्ही कधीच विसरू शकणार नाहीत. त्यांच्या आशीर्वादाने आम्ही छान आहोत.

. **मोठी माणसं खरंच देवमाणसं असतात. त्यांना कधीच विसरू नका. रोजच त्यांना नमस्कार करा. नि आशीर्वाद घ्या. मग असे डेज साजरे करावेच लागत नाहीत. एक दिवस उदो उदो नि इतर वेळी भांडणं. काही उपयोगी नाहीत. त्यांची शेवटपर्यंत सेवा करा. त्यांना आश्रमात वगैरे ठेवू नका. घरी व्यवस्थित सेवा करा. तरच त्यांना बरं वाटेल तो आनंद तुम्ही डोळ्यांनी पहा. त्यांतच सर्व भरून येतय पहा. बाबा हा देवच आहे. हे लक्षात ठेवा. आमच्या बाबांना अजूनही आम्ही घरी एकत्र जमलो की खूप आनंद होतो. तो आनंदी चेहरा बघण्यासारखाच असतो.**

**वैजयंती करंदीकर, कणकवली**

## बापाचं काळीज

**दीपक गुंडये, मुंबई**

मागच्याच आठवड्यात एकाच्या व्हॉट्सअप स्टेटसला एक व्हिडिओ क्लीप पाहिली. यात एकजण फोनवर बोलत असतो. मुलीच्या अपरणकर्त्याशी बोलताना निश्चयी स्वरात तो सांगतो की तू कोण आहेस हे मला माहिती नाही. तुला खंडणी हवी असेल तर माझ्याकडे पैसे नाहीत. पण माझ्या दीर्घ सेवेतून मी अशी काही कौशल्ये आत्मसात केली आहेत की त्याद्वारे मी तुला शोधून काढेन. त्यामुळे बऱ्या बोलाने माझ्या मुलीला सोडून दे. नाहीतर तुझ्यापर्यंत पोहोचून मुलीला सोडवून तुला ठार करेन.

गुगलवर शोध घेतला असता हा प्रसंग टेकन (Taken) या २००८ साली प्रदर्शित झालेल्या इंग्रजी चित्रपटातील असल्याचे कळले. याच नावाचे तीन चित्रपट ठराविक अंतराने प्रदर्शित झाले होते. या तीन चित्रपटाच्या मालिकेत सरकारी गुप्तहेर संस्थेतून निवृत्त झालेल्या व्यक्तीची मुलीच्या सुटकेसाठीची साहसकथा चित्रित करण्यात आली आहे. मुलीबाबत हळवे असलेले बापाचे मन प्रसंगी कठोरही होते हेच या चित्रपट मालिकेतून समोर येते. सर्वसाधारणपणे असेच तर असते बापाचे काळीज !!

जून महिन्याच्या तिसऱ्या रविवारी साजरा करण्यात येणारा जागतिक पितृदिन अशाच बापांचे महत्त्व अधोरेखित करतो. हल्ली समाजमाध्यमांचा वापर वाढल्यामुळे विविध दिवस साजरे करण्याचे आणि त्याबाबत पोस्ट करण्याचे प्रमाण वाढले आहे. यंदाच्या फादर्स डेलासुद्धा (१६ जून) ते प्रकर्षाने जाणवले. बाबांबरोबरचे लहानपणीचे फोटो, मोठेपणीचे फोटो समाजमाध्यमांवर ठेवून जागतिक पितृदिनाच्या शुभेच्छा दिल्या गेल्या. बापाचं गुणगान करणारी एखादी चारोळी, कविता, छानशी आठवणही या निमित्ताने वाचनात आल्या. त्याचवेळी हे ही लक्षात आले की आईची महती मात्र यापेक्षा कैकपटींनी कित्येक कवी, लेखकांनी सांगितली आहे. त्यांच्या लेखणीतून बाप मात्र क्वचितच उतरला होता. पण जागतिक पितृदिनाचे औचित्य साधून का होईना बऱ्याच जणांच्या व्हॉट्सअप स्टेटसला बापावरचं लिखाण दिसून आलं. तसं पाहायला गेलं तर बापाचं काळीज सहसा उमगून येत नाही. कारण बाप फारच क्वचित व्यक्त होतो. आईची माया कशी प्रत्येक बाबतीत सहजरित्या दिसून येते तशी बापाची माया दिसून येईलच असे नाही. त्यामुळे मुलांना शिस्त यावी म्हणून थोडेसे कठोर वागणारा बाप मुलांना मात्र जमदग्नीचा अवतार वाटतो. म्हणूनच की काय पौगंडावस्थेत असलेल्या काही मुलांच्या मित्रसमुदायात वडिलांचा एकेरी उल्लेख होतो. याच समुदायात मित्रांना वडिलांच्या नावाने संबोधण्याचे प्रतापही होतात. कधी कधी टिंगलटवाळीचा विषयही होतात. पण हेच मुलींकडून होणार नाही. कारण मुलगी आणि बाबाचे एक हळवं नातं असतं. मुलीची लग्नानंतर पाठवणी करताना कितीही कठोर असला तरी बाप अश्रू गाळतोच. बापाचं काळीज त्यावेळी खऱ्या अर्थाने कळते. मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी धडपडणारा बाप प्रसंगी स्वत: उपाशी राहतो पण मुलांच्या मुखात घास कसा जाईल याची तजवीज करतो. मुलांची हौसमौज पूर्ण करण्यासाठी कधी कधी आपल्या हौसेला मुरड घालतो. अशा बापाचं काळीज खऱ्या अर्थाने उमगू लागतं जेव्हा आपण स्वत: बापाच्या भूमिकेत शिरतो. आपल्या मुलांच्या बाबतीत अगदी बाबांसारखेच आपण वागायला लागतो तेव्हा बाबांच्या प्रत्येक गोष्टीचा अर्थ नव्याने उलगडायला लागतो आणि आपलं काळीजही बापाचं काळीज होऊन जातं !



**कु. अथर्व सुनील रांगले,**
**इयत्ता- सातवी**





कु. स्वानंदी हरेश मोहीत,
कोंगळे, ता. दापोली.

लहानपणी माझी शाळा या विषयावर सर्वांनीच निबंध लिहीला असेलच. मात्र त्यावेळी आपण जसे होतो, जसे वागत होतो तेच आपण आपल्या तोडक्या मोडक्या किंवा थोडक्या शब्दात लिहत होतो. परंतु आज शाळेतील आठवणी लिहायचं म्हंटल तर काय लिहावं आणि कुठून सुरुवात करावी काही सुचत नाही. कारण शाळेतील एक आठवण असो वा शाळेतील दिवस हे नेहमी स्मरणात राहणारे असतात. त्या दिवसांमध्ये केलेल्या खोड्या, खालेला मार किंवा केलेली मैत्री जीवनभर मनाला सुखावा देणारी असते. शाळेतील मित्र कितीही दूर असले तरी मनाने ते आपल्या सोबतच आहेत असे नेहमी वाटत राहते. त्या काळात केलेल्या गंमतीजमती, नवी उपक्रम या सर्व आठवणी कायस्वरूपी मनात कोरल्या गेलेल्या असतात. आता शाळा म्हटल की सर्वप्रथम आठवतात त्या गोष्टी म्हणजे निळा पांढरा गणवेश, ढोपरा एवढी पॅन्ट, पाठीवर आपल्या वाजणापेक्षा जास्त दप्तर, गळ्यात लाल रंगाची टाय अर्थात मुलांचा एक प्रकारचा छोटा रुमालाच आणि त्यात खालेला मार या आता आठवल्या तर स्वतःलाच हसायला येतं. पण कधीकाळी याच गोष्टी मनाला आनंद देऊन जात होत्या. खरं तर आज शाळा सोडून मला दोन वर्ष झाली. परंतु आजही 15 जुन च्या दिवशी आपल्या आईवडिलांकडे नवीन दप्तर किंवा गणवेशासाठी हट्ट करताना मुलांना पाहिले तरी असं वाटत की आपण ही असंच हट्ट एकेका गोष्टीसाठी केला असणार. एकंदरीत काय तर सर्व आठवणीना एक उजाळा मिळतो. एकदा शाळा सुरु झाली की कधीही लवकर न उठणारे शाळेच्या दिवशी बरोबर लवकर उठून आपापलं सर्व आवरून याच्या घरी जा, त्याच्या घरी जा असं करत आपल्या संपूर्ण टोळीला घेऊन शाळेत जायचो. मग शाळेतील साफसफाई करून, फळ्यावर छानसा सुविचार लिहून प्रार्थनेला बसायचो. प्रार्थनेला बसायच्या आधी एकदा शाळेतील घंटा वाजायची आणि खऱ्या अर्थाने शाळेतील दिवसाला सुरुवात झाली असं वाटायचं. मग गृहपाठ तपासणे किंवा नवीन नवीन उपक्रम करणे हे चालूच असायचं. हे सर्व झालं की जास्त आतुरता असायची ती म्हणजे जेवणाच्या वेळेची. कारण एकदा जेवणाची वेळ झाली की पाच कसे वाजायचे समजायचंच नाही. मग पाच वाजता वंदे मातरम म्हणत शाळा सुटायची आणि आज कोणी किती मार खाल्ला, कोणाला शाब्बासकी मिळाली किंवा आज अभ्यास कोणाला काय काय आहे या विषयी चर्चा करत घरी जायचो. खरंच ते दिवसच काही वेगळे होते. थंडीच्या दिवसात शाळेत होणाऱ्या स्पर्धां असो वा पावसाळ्यात शेत लावणे, रानातील भाज्यांविषयी जाणून घेणे किंवा उन्हाळ्यातील वनभोजन किंवा सहल असो त्यातून मिळणारा आनंद किंवा मजा काही औरच असे. त्यावेळी शाळेत रक्षाबंधन, कृष्ण जन्माष्टमी, सरस्वती पूजन असे देखील सण साजरे होत असत. त्यामुळे आपल्या पाठीवर चार च्या अंकाची सरस्वती काढून त्याची पूजा करायचो. तसंच रक्षाबंधनाच्या दिवशी स्वतः राखी तयार करून मुलांना बांधायचो. खरंतर आम्हाला शाळेत फक्त पुस्तकीय ज्ञान नाही तर बाहेरील जगातील पण पाठ शिकवण्यात आले. मग कधी ते निसर्गातील ठिकाणाची माहिती घेऊन तर कधी आपल्या लेखणीच्या मदतीने निसर्गालाच आपल्या शब्दात मांडून. म्हणूनच आज कधीही किंवा कुठेही जर शाळेतील एक मित्र मिळाला तरी थोड्या विचारपूस करून एक विषय हमखास निघतो आणि तो म्हणजे शाळेतील दिवस. कारण नाही म्हंटल तरी शाळेतील काळ हा एक प्रकारे माणसाच्या जीवनातील सुवर्णकाळ असतो आणि त्यातील आठवणी म्हणजे सुवर्णक्षण म्हणून त्या नेहमी आठवणीत राहणाऱ्या असतात.



कु. दीप राकेश शिगवण,
इयत्ता- सातवी



कु. विराज राजेंद्र मुलूख,
इयत्ता- सातवी

## एक कोकणी मुलगी- आपल्या गावाचे गोडवे गाणारी! तिच्या उमेदीची कहाणी!

मुंबईतील एंट्स इंग्लिश स्कूलमध्ये शिकणारी, प्रांजल प्रल्हाद घाडीगांवकर. नाटळ (कणकवली) गावची जन्मभूमी असलेली एका सात वर्षीय मुलीने आपल्या गावाचा आणि भाषेचा अभिमान जपणारे अद्वितीय काम सुरू केले आहे. आपल्या गावाची आणि मालवणी भाषेची जबरदस्त ओढ असलेल्या ह्या मुलीने सातव्या वर्षापासूनच सोशल मीडियावर आपल्या गावाचे आणि भाषेचे गोडवे गाणारे अप्रतिम व्हिडीओ शेअर करायला सुरुवात केली. आता ती इयत्ता- तिसरीत शिकत आहे. तिची मालवणी भाषेची आवड आणि गावाबद्दलचा प्रेम यामुळे ती प्रत्येक व्हिडीओतून आपल्या गावाच्या संस्कृतीची आणि निसर्गाची महती जगासमोर आणते. तिला तिच्या या कामासाठी तिच्या वडिलांचे मित्र, कोकणातील त्रिंबक या गावचे शिक्षक बाबू घाडीगांवकर आणि तिच्या वडिलांचे शिक्षक - अरुण म. वळंजू यांचं मोलाचं मार्गदर्शन आणि शाबासकीची थाप कायम मिळाली. यंदा तिने आपल्या शाळेतून एक महिन्याची सुट्टी घेऊन फेसबुक आणि यूट्यूबच्या माध्यमातून जल, जंगलं, आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जनजागृती करण्याचे काम केले. आपल्या भावंडांसोबत तिने रुक्षारोपणही केले.

या महिनाभराच्या सेवाकाळानंतर ती मनावर मोठा दगड ठेवून पुन्हा मुंबईत परतत आहे. शिक्षणासाठी तिला मुंबईत परतावे लागले असले तरी तिच्या गावाच्या सेवेसाठीची तिची उर्मी आणि जिद्द वाखाणण्याजोगी आहे. तिच्या या उमेदीला आणि जिद्दीला सलाम करत, तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा आणि आशीर्वाद देऊया. तिच्या कामाची झलक पाहण्यासाठी तिचे YouTube चैनल @Konkan_Village_Stories आणि Facebook पेज 'Pralhad Ghadigaonkar'

**नक्की बघा.**

## सोहमला पडले एक स्वप्न



कु. अथर्व सुनील रांगले,
इयत्ता- सातवी.

एक छोटसं गाव होतं. त्या गावात सोहम नावाचा मुलगा राहत होता. त्याचा एक सुंदर घर होता. रविवारचा दिवस होता. सोहमच्या शाळेला सुट्टी होती. त्या दिवशी तो लवकर उठून मित्रांसोबत जायचे ठरवले परंतु त्या दिवशी नेमके जोरदार पाऊस पडत होता. विजांचा कडकडाट आणि ढगांचा गडगडाट चालु होता नदी - नाले, विहिरी, शेती पावसाच्या पाण्याने तुडुंब भरले होते. संध्याकाळी पाऊस शांत झाल्याने नदीला आलेला पूर पण कमी झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी नदीचे पाणी शांत झालं होतं. सोमवारी सोहम शाळेत आला. तो सारखा सारखा विराजला सांगत होता की मी आज गडदे लावणार आहे. शाळा सुटल्यानंतर सोहम लगेच घरी गेला आणि नदीवर गडदे लावायला गेला. सोहम गडदे लावुन घरी आला. तो घरी येऊन टीव्ही बघत होता. टीव्ही बघुन झाल्यानंतर सोहम जेवला आणि झोपून गेला. सोहमला एक स्वप्न पडले की माझ्या एका गडदयात पाच खेकडे आणि दुसऱ्या गडदयात चार खेकडे आणि तिसऱ्या गडदयात तीन खेकडे सापडले आहेत. सोहम सकाळी लवकर उठून गडदे काढायला गेला. त्याने गडदे काढले. तर त्याला एकूण बारा खेकडे मिळाले होते. त्यानंतर सोहमला त्याचे स्वप्न आठवले. नंतर तो म्हणाला माझे स्वप्नं पूर्ण झाले. नंतर त्याने खेकडे सरांना दिले आणि सरांनी सोहमला 200 रुपये बक्षिस म्हणून दिले.





कु. प्रसाद नरेश शिगवण,
इयत्ता- सातवी